मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | रविवार, १७ ऑगस्ट २०२५ | वर्ष- ३० | अंक-५६ | पाने - ८

## गोविंदा रे गोपाळा...





इच्छाशक्ती नसलेले राज्यकर्ते...

पान ८

# मुंबईसहीत सर्व महापालिकांची हंडी आम्हीच फोडणार

## टेंभीनाक्यावर फडणवीसांचे वक्तव्य



प्रतिनिधी
■ मुंबई / ठाणे

मुंबईसहीत सर्व महापालिकांची हंडी आम्ही फोडणार आहोत, पूर्वी त्यातील लोणी काही विशिष्ट लोकांकडे जात होते. ते लोणी आता जनते पर्यंत नेण्याचे काम आम्ही करणार आहोत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

टेंभीनाका येथे टेंभीनाका मित्र मंडळाच्या माध्यमातून शनिवारी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे तसेच विविध भागातून या हंडीनिमित्ताने गोविंदा पथके थर रचण्यासाठी येत असतात. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांनी ही दही हंडी देशपातळी पर्यंत नेण्याचे काम केले. या दहीहंडी निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे टेंभीनाका उपस्थित होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आनंद दिघे साहेबांची टेंभीनाक्याची ऐतिहासिक दहीहंडी आहे. दिघे साहेबांनी दिलेल्या शिकवणीनुसार कारभार चालविणारे आमचे एकनाथ शिंदे यांनी हा वारसा समर्थपणे चालविला आहे असे फडणवीस म्हणाले. मागच्या वर्षी आम्ही सत्तेची हंडी फोडली. आता यावर्षी मुंबई सहित सर्व महापालिकांची हंडी फोडणार आहोत, पूर्वी त्यातील लोणी काही विशिष्ट लोकांकडे जात होते. ते लोणी आता जनते पर्यंत नेण्याचे काम आम्ही करणार आहोत असे फडणवीस म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते.

राज्यसह देशभरात दि. १६ ऑगस्ट रोजी, दहीहंडीचा सण उत्साहात साजरा झाला. यावेळी दहीहंडीच्या उत्सवामध्ये पावसाच्या दमदार हजेरीमुळे, दहीहंडीचा थरार आणखीनच रंगला.

पान ६ वर

# ट्रम्प-पुतिन बैठक निष्फळ

## अवघ्या 12 मिनिटांच्या पत्रकार परिषदेनंतर दोघेही गेले निघून

वृत्तसंस्था
■ वॉशिंग्टन

रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची अलास्कामध्ये भेट झाली. युक्रेन युद्ध संपवण्याबाबत त्यांची सुमारे ३ तास बैठक झाली. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी फक्त १२ मिनिटे संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यादरम्यान त्यांनी पत्रकारांच्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे दिली नाहीत.



पत्रकार परिषदेदरम्यान ट्रम्प म्हणाले की, आमची बैठक खूप सकारात्मक होती. आम्ही अनेक मुद्द्यांवर सहमत झालो, पण कोणताही करार झाला नाही. जेव्हा तो अंतिम होईल तेव्हाच करार होईल. त्याच वेळी, पुतिन म्हणाले की रशियाची सुरक्षा त्यांच्यासाठी सर्वात महत्त्वाची आहे. त्यांनी पुढील बैठक मॉस्कोमध्ये आयोजित करण्याचा सल्ला दिला. त्यांचे म्हणणे सांगितल्यानंतर, दोन्ही नेते ताबडतोब व्यासपीठावरून निघून गेले.

पुतिन शनिवारी जवळपास १० वर्षांनी अमेरिकेत पोहोचले. येथे त्यांचे स्वागत बी-२ बॉम्बरने केले. रेड कार्पेटवर येताच ट्रम्प यांनी त्यांचे कौतुक केले. त्यानंतर पुतिन ट्रम्प यांच्या गाडीत बसले आणि बैठकीसाठी निघून गेले.

दोन्ही नेत्यांनी 'अलास्का २०२५' लिहिलेल्या व्यासपीठावर उभे राहून पोज दिली. त्यांच्या मागे एक B2 बॉम्बर विमान आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत विमान, एअर फोर्स वन होते.

पान ६ वर

# मुंबईत पावसाचा काला...

## जनजीवन विस्कळीत

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईसह पूर्ण महाराष्ट्रातच आज गोपाळकाल्याच्या दिवशी पावसाने दमदार हजेरी लावली. मुंबईत तर अनेक सखल भागात पाणी साचले. रस्ते व रेल्वे सेवेवर आज बऱ्यापैकी परिणाम झाला होता. आज दिवसभर हवामान खात्याने मुंबईला रेड अलर्ट दिला होता. त्यामुळे सर्वच यंत्रणा अलर्ट होत्या.




मुंबईत गेले काही दिवस संततधारेने पडणाऱ्या पावसाने शुक्रवारी रात्रीपासून शनिवारी सायंकाळपर्यंत जोरदार बरसात केली. त्यामुळे दादर, शीव, किंग्जसर्कल, माटुंगा, कुर्ला, घाटकोपर, मानखुर्द, भांडूप, मुलुंड, अंधेरी सबवे आदी सखल भागात पावसाचे पाणी कमी - अधिक प्रमाणात साचले. तसेच, कुर्ला, शीव, माटुंगा, भांडूप आदी ठिकाणी रेल्वे मार्गात काही प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे रस्ते आणि रेल्वे मार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला. मध्य, हार्बर, पश्चिम रेल्वे मार्गावरील रेल्वे वाहतूक काहीशी उशिराने सुरू होती.

पान ६ वर
संबंधित वृत्त पान ३ वर

## म ह त्त्वा चे

### सिएटलच्या 'स्पेस नीडल'वर फडकला तिरंगा

**वॉशिंग्टन :** भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेतील सिएटल शहरात एक ऐतिहासिक घटना घडली. शहराच्या सुप्रसिद्ध 'स्पेस नीडल' इमारतीवर पहिल्यांदाच भारतीय तिरंगा फडकावण्यात आला. 1962 मध्ये वर्ल्ड फेअरच्या निमित्ताने बांधण्यात आलेली ही इमारत सिएटलच्या आकाशरेषेचे प्रतिक मानली जाते आणि अमेरिका-पॅसिफिक उत्तर-पश्चिम भागाच्या तंत्रज्ञानाधिष्ठित प्रगतीचं प्रतीकही आहे.या ऐतिहासिक उपक्रमात भारताचे सिएटलमधील कॉन्सुल जनरल, सिएटलचे महापौर ब्रूस हॅरेल, तसेच शहरातील अनेक मान्यवर आणि अधिकारी सहभागी झाले.

### बायको नांदायला येत नसल्याने **नवऱ्याने 4 मुलांसह आयुष्य संपवलं**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यात हृदय पिळवून टाकणारी धक्कादायक घटना घडली आहे. बायको नांदायला येत नाही म्हणून नवऱ्याने मुलांसह आयुष्य संपवलं आहे. पोटच्या मुलांना विहिरीत ढकलून बापाने स्वत: आत्महत्या केली. राहाता तालुक्यातील को-हाळे शिवारातील घडलेल्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

सविस्तर वृत्त पान ६ वर

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना


नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री


देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

"आयुष्मान कार्ड व आयुष्मान वय वंदना कार्ड निर्मिती विशेष मोहीम"
दिनांक १६ ते ३१ ऑगस्ट २०२५



एकत्रित योजनेंतर्गत प्रति कुटुंब **प्रति वर्ष ५ लाख रुपयांचे** उपचार
**१,३५६** उपचारांचा समावेश; **२,३००+** अंगीकृत रुग्णालये
आयुष्मान वय वंदना योजनेंतर्गत राज्यातील **७० वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी** मोफत आरोग्य सेवा
**७० + ज्येष्ठ नागरिकांसाठी** अधिकचे **५ लाख** रुपयांचे उपचार
आधारकार्ड आणि आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल यांच्या आधारे कुटुंबातील ७० + ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्मान वय वंदना कार्ड आजच तयार करा

कार्ड बनविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे
१. अद्ययावत शिधापत्रिका २. आधार कार्ड
३. आधार क्रमांकाला जोडलेला मोबाईल

आयुष्मान कार्ड बनविण्यासाठी शासकीय कार्यालयातील मदत कक्ष, आशा सेविका, स्वस्त धान्य दुकान, आपले सरकार सेवा केंद्र किंवा अंगीकृत रुग्णालयातील आरोग्य मित्र यांच्याशी संपर्क साधावा.

'आयुष्मान ॲप' डाउनलोड करण्यासाठी शेजारील QR कोड स्कॅन करा

संकेतस्थळ : beneficiary.nha.gov.in


देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री | एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री | अजित पवार उपमुख्यमंत्री | प्रकाश आबिटकर मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण | मेघना साकोरे - बोर्डीकर राज्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

१५५३८८ / १८००२३३२२०० | १४५५५ / १८००१११५६५

डी.जी.आय.पी.आर./ आरओसी २१४९ /२०२५-२६

**मुंबई:** श्री समर्थ कृपा स्वामी भक्त मंडळ श्रीदत्त मंदिर ट्रस्ट कांजूरगांव यांच्या विद्यमाने सालाबादप्रमाणे याही वर्षी कांजूर भांडुप (पूर्व) येथील १० वी व १२ वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मंडळाचे सल्लागार बाबा कदम यांच्या हस्ते बक्षिस देवून त्यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी विश्वस्त पांडुरंग गांवकर महाराज, अनंत सावंत, गजानन खोत, अध्यक्ष रमाकांत पाटील व खामकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## थोडक्यात

### चांदिवली उद्यान उदंचन टाकीतून 19 ऑगस्टपासून पाणीपुरवठा सुरु

**मुंबई:** चांदिवली - संघर्ष नगर मधील रहिवाशांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने विजय अग्निशमन मार्गावरील महानगरपालिका उद्यान येथे नवीन उदंचन टाकीचे बांधकाम पूर्ण केले आहे. या उदंचन टाकीतून मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५ पासून संघर्ष नगर येथील इमारत क्रमांक ९, १०, ११, १२, १३ आणि १३ अ यांना पाणीपुरवठा केला जाणार आहे. दररोज दुपारी १२.०० ते सायंकाळी ४.०० ही पाणीपुरवठ्याची नियमित वेळ असणार आहे. नवीन उदंचन टाकीतून पाणीपुरवठा केला जाणार असून नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पुढील ४ ते ५ पाणी उकळून - गाळून प्यावे, महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

### एनटीसीच्या गिरणी कामगारांनाही 405 चौरस फुटाचे घर मिळणार

**मुंबई:** राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाच्या (एनटीसी) अखत्यारितील गिरण्यांच्या जागेतही आता गिरणी कामगारांना घरे मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. यासाठी विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करण्यात येणार आहे. याबाबत नगरविकास विभागाने मसुदा जारी केला असून हरकती व सूचना सादर करण्यासाठी महिन्याभराची मुदत देण्यात आली आहे. ही सुधारणा मंजूर झाली तर एनटीसी गिरण्यांच्या जागेवर गिरणी कामगारांना ४०५ चौरस फुटाचे घर मिळणार आहे.मुंबईत ५८ गिरण्या असून त्यापैकी दहा गिरण्यांमध्ये म्हाडाच्या वाट्याला एकही घर आलेले नाही. उर्वरित गिरण्यांच्या पुनर्विकासात म्हाडाला गिरणी कामगारांसाठी २८ हजारच्या आसपास घरे उपलब्ध होणार आहेत. या घरांसाठी पावणेदोन लाख गिरणी कामगार वा त्यांच्या वारसांनी म्हाडाकडे अर्ज केले आहेत. या सर्व गिरणी कामगारांना मुंबईत घरे मिळणे आता अशक्य आहे. उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी गिरणी कामगारांना झोपडपट्टी पुनर्विकासात घरे देण्याची घोषणा केली. मात्र त्याबाबत शासनाने अद्याप धोरण निश्चित केलेले नाही. त्यामुळे आता गिरणी कामगारांपुढे आता मुंबईबाहेरील परिसर हाच पर्याय राहिला आहे. एनटीसी गिरण्यांच्या जागांवर असलेल्या ११ चाळींतील रहिवाशांना पुनर्विकासात घर उपलब्ध व्हावे, यासाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने सतत पाठपुरावा केला होता. अखेर गिरण्यांच्या जागेवरील चाळींतील रहिवाशी ४०५ चौरस फुटाच्या घरासाठी पात्र असले तरी त्या मोबदल्यात विकासकाला प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्रफळ उपलब्ध होत नव्हते. त्यामुळे या इमारती वा चाळींच्या पुनर्विकासासाठी विकासक पुढे येत नव्हते. अखेरीस राज्य शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करणारा मसुदा जारी केला आहे. या मसुद्यानुसार एनटीसी गिरण्यांच्या जमिनीवरील इमारती वा चाळीतील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी लागणारे चटईक्षेत्रफळ आणि त्यानुसार प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्रफळ देण्यात येणार आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांचा घणाघात

# नालासोपारा मतदारसंघातही मतचोरी ... घोळच करायचा असेल तर निवडणुका घेताच कशाला?

प्रतिनिधी
■ वसई

काँग्रेसचे नेते तथा खासदार व केंद्रीय विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुका तसेच विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतचोरी करून निवडणुका घश्यात घातल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केल्यानंतर देशभरात एकच खळबळ उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर नालासोपारा मतदार संघातही मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांत घोळ दिसून आला असून यावर बहुजन विकास आघाडीचे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी आक्रमक पवित्रा घेत निवडणुका घेताच कशाला? असा घणाघात केला आहे.




नालासोपारा मतदारसंघात एका महिलेची मतदार यादीत सहा वेळा नोंदणी असल्याचा गंभीर व धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे या मत चोरीवर आता प्रकाश पडला आहे. ३९ वर्षीय सदर महिलेचे नाव सहा वेळा मतदार यादीत असल्याने तिने सहा वेळा मतदान केले आहे का? किंवा तिच्या नावाने भलत्यानेच कोणी मतदान केले आहे यावर आता चौकशी करण्याचे आदेश पालघर जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी तेजस चव्हाण यांनी प्रशासनाला दिले आहेत. याबाबत बहुजन विकास आघाडीचे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याशी पत्रकारांनी संवाद साधला असताना त्यांनी मतदार यादीतील मोठ्या प्रमाणात घोळ असल्याचे पुराव्यानिशी समोर आणले आहे. त्यामुळे सार्वत्रिक मतदान घेण्याच्या पद्धतीवरच आता बोट ठेवले गेले आहे.

माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी एका मुलाखतीत दिलेल्या माहितीनुसार, कोणी पूजा सिंग नामक महिलेची ६३ वेळा नोंदणी झाल्याचे आढळून आले आहे. त्याचप्रमाणे सुनील यादव नामक व्यक्तीची ५३ वेळा नोंदणी आढळून आली आहे. तसेच अभिषेक सिंग या व्यक्तीचे नाव ४७ वेळा नोंदवले गेले असल्याचे माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांनी या मुलाखतीत निदर्शनास आणून दिले. माजी आमदारांनी मतदार यादीतील सदर घोळ लक्ष्यात आणून दिल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगावर होत असलेल्या आरोपाला बळकटी मिळाली आहे. निवडणूक आयोग कोणतीही ठोस माहिती देत नसल्याने हा संशय बळावला आहे.

नालासोपाऱ्यात सहा वेळा मतदार यादीत नाव असलेली ती महिला, तसेच सुनील यादव, पूजा सिंग, अभिषेक सिंग याप्रमाणेच आणखी नावे मोठ्या प्रमाणात सहभागी असण्याची शक्यता आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हा घोळयुक्त डेटा समोर आणल्यानंतर स्थानिक राजकीय पक्ष देखील या मत चोरीचा आढावा घेऊ लागले आहेत. मोठ्या प्रमाणात हा घोळ असल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त होऊ लागला आहे. तसेच यापुढे वसईतील आगामी महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला मोठा धक्का बसण्याची चिन्हे आहेत. जे राजकीय वादळ वसईत भाजपने उठवले होते त्या वादळाची दिशा बदलून ते आगामी निवडणुकीत शांत करण्याचे काम मतदार करू शकतात, असा राजकीय जाणकारांचा व्होरा आहे. तसेच सुजाण मतदार या कथित मतचोरी प्रकरणात संताप व्यक्त करत असून आगामी पालिका निवडणुकीत भाजपला विरोधी पक्ष चांगलेच घेरतील असा अंदाज व्यक्त होत आहे.

# नायगाव पूर्वेत दहीहंडीचा जल्लोष

## नालासोपारा येथील साई गोविंदा पथक विजेते



प्रतिनिधी
■ वसई

वसई तालुक्यातील नायगाव पूर्व परेरा नगर शुक्रवारी संध्याकाळी भाजपच्या नेतृत्त्वाखाली दहीहंडी उत्सवाने दणाणून गेला. या सोहळ्याला पालघर लोकसभा खासदार डॉ. हेमंत सावरा, वसई विधानसभा आमदार स्नेहा दुबे-पंडित, नालासोपारा विधानसभा आमदार राजन नाईक, भाजप वसई-विरार जिल्हाध्यक्षा प्रज्ञा पाटील, वसई पूर्व-दक्षिण तालुका अध्यक्ष उदय शेट्टी यांच्यासह ज्येष्ठ नेते निशिकांत म्हात्रे, केसरीनाथ म्हात्रे, कैलास म्हात्रे, हरिहर पाटील आणि जिल्हा सरचिटणीस भूषण किणी आदींची उपस्थिती होती. या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला राजकीय वैभव आणि भाजपची ताकद अधोरेखित झाल्याचे चित्र दिसले.

या दहीहंडी उत्सवात ३० पथकांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी तब्बल ४ लाख रुपयांचे सामूहिक बक्षीस ठेवण्यात आले होते. अखेर जोरदार संघर्षात नालासोपारा येथील साई गोविंदा पथकाने दहीहंडी फोडत विजेतेपद मिळवले.या उत्सवाचे काटेकोर नियोजन भाजप जिल्हा सचिव प्रविण गावडे, तालुका सरचिटणीस धरेंद्र कुलकर्णी व महिला मोर्चा अध्यक्षा हर्षलाताई गावडे यांनी केले. त्यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम शिस्तबद्ध व जल्लोषमय झाला.हा उत्सव केवळ धार्मिक-सांस्कृतिक न राहता भाजपची ताकद, नेत्यांचा प्रभाव आणि कार्यकर्त्यांचा उत्साह जनतेसमोर प्रदर्शित करण्याचा एक मंच ठरला.

# जूचंद्र तलावातील कारंजे वर्षभरापासून बंद

## एलईडी दिव्यांच्या अभावामुळे परिसर अंधारमय

प्रतिनिधी
■ वसई

वसई-विरार शहर मनपा क्षेत्रातील जूचंद्र गावाचा तलाव परिसर सुशोभिकरणानंतर आकर्षक बनवण्यात आला असला तरी गेल्या एक वर्षापासून येथील कारंजे बंद पडले आहे. यामुळे तलावाच्या सौंदर्यात व परिसराच्या आकर्षणात मोठी घट झाली आहे.



तलाव परिसरात असलेले कारंजे बंद असल्याने आणि एलईडी दिव्यांचा अभाव असल्याने रात्रीचा परिसर अंधारात बुडतो. त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळी येथे फिरताना असुरक्षिततेची भावना निर्माण होते. स्थानिक रहिवाशांनी अनेकदा तक्रारी करूनही कारंजा दुरुस्त करण्याकडे आणि प्रकाशव्यवस्था सुधारण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्षच सुरू आहे. भाजप नेते चंद्रकांत भालचंद्र पाटील यांनी या पार्श्वभूमीवर वसई-विरार महापालिकेच्या 'जी' वालीव विभागाच्या सहायक आयुक्तांना निवेदन देत तलाव परिसरात तातडीने तीन पोल लावून एलईडी दिवे बसविणे आणि कारंजे सुरू करण्याची मागणी केली आहे. गौरी गणपती उत्सवाच्या काळात भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षितता आणि परिसराच्या सौंदर्यासाठी हे काम तातडीने पूर्ण करावे, असा त्यांचा आग्रह आहे.

# ओबडधोबड, खड्डेमय रस्ते; आयुक्त मात्र मॅरेथॉन तयारीला

## नव्या आयुक्तांवर नागरिकांची टीका

प्रतिनिधी
■ वसई

वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील अंतर्गत रस्त्यांची अवस्था पावसाच्या तडाख्यामुळे चाळण झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे, उखडलेले डांबर आणि वाहतूककोंडीच्या समस्येमुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत नव्याने नियुक्त झालेले आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी डिसेंबरमध्ये होणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या तयारीसाठी आढावा बैठक घेतल्याने नागरिकांच्या संतापाचा भडका उडाला आहे.



अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था आणि पावसाळ्यातील खड्डे बुजवणे ही प्राथमिक गरज आहे, मग मॅरेथॉनची लगीनघाई कशासाठी?" असा प्रश्न उपस्थित होत आहे. रस्त्यांच्या समस्या निकाली काढण्याऐवजी स्पर्धेच्या तयारीवर भर देत असल्याने नव्या आयुक्तांनाही टीकेचा धनी व्हावे लागत आहे.महापालिकेच्या हद्दीत अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झाला असून, लोकसंख्या आणि वाहनांची संख्या दोन्ही झपाट्याने वाढली आहे. परिणामी, आधीच अपुऱ्या असलेल्या रस्त्यांवर प्रचंड ताण येत आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यांची दुरवस्था अधिकच गंभीर झाली आहे. पालिका प्रशासनाने गणेशोत्सवापूर्वी काही ठिकाणी डागडुजी सुरू केली असली तरी ती केवळ 'थुकपट्टी' असल्याची टीका नागरिक करत आहेत.नव्या आयुक्तांनी पदभार स्वीकारताच नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या समस्या सोडवण्याला प्राधान्य द्यावे, अशी मागणी होत असून, प्रशासनाला आत्मपरीक्षणाची आणि प्राधान्यक्रम ठरवण्याची वेळ आली आहे, असा टोला सुजाण नागरिकांकडून लगावला जात आहे.



**मुंबई:** सर्वोदय बिल्डिंग दादर येथे परंपरागत गोविंदा दही हंडी खेळ, खेळला गेला. शनिवारी दुपारी १ वाजता ब्राह्मणदेव गोविंदा पथक, प्रभादेवी यांनी ६ थर लावून ही हंडी फोडली. त्यावेळी इमारतीचे विश्वस्त दिवाकर दळवी. सर्वोदय बिल्डिंग नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष नंदन कदम, तसेच उत्साही कार्यकर्ते मनीष मेहता, गौरव पाटील, इमारतीमधील बहुसंख्य रहिवासी या आनंदात सहभागी झाले होते. विजयी पथकाला यावेळी बक्षीस देण्यात आले.



**मुंबई: गोरेगावच्या श्री विठू माऊली गोविंदा पथक व राजाधिराज गोविंदा पथकातील बाल गोविंदांच्या उत्साहात भर घालत, व दहीहंडी फोडण्याचा आनंद द्विगुणित करण्यासाठी गोरेगाव मधील युवा नेते मनोज यादव यांनी त्या सर्वांना टी-शर्ट भेट देऊन त्यांचा उत्साह वाढवला.**



**मुंबई:** भारतीय स्वतत्र्यदिनानिमित्त बौध्दजन पंचायत समिती शाखा क्र. १५३ आणि शाखा क्र. ४३३ यांच्या संयुक्त विद्यमाने सांताक्रूज पश्चिम (भीमवाडा) येथे ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) मुंबई प्रदेश सरचिटणीस विवेक गोविंदराव पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि शाळेतील विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

# विकसित भारतात आदिवासींकडे दुर्लक्ष, निवाऱ्यासाठी स्वातंत्र्यदिनीच आंदोलन

प्रतिनिधी
■ विक्रमगड

भारताचा 79 वा स्वातंत्र्य दिन देशभरात उत्साहात साजरा होत असताना, विक्रमगड तालुक्यातील एका आदिवासी भगिनीने आपल्या संसारासह पंचायत समितीच्या दारात धडक देत स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही 'निवारा' या मूलभूत हक्कासाठी झगडावे लागत असल्याची जिवंत हकीकत उघड केली आहे.



विक्रमगड तालुक्यातील वेढे धिंडेपाडा येथील सौ. नयना फेसरडा यांना मागील मे महिन्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत (इंदिरा आवास घरकुल योजना) घर मंजूर झाले. परंतु दुसऱ्या हप्त्याचा निधी वेळेवर न मिळाल्याने घर बांधकाम अपूर्ण राहिले. पावसाळा सुरू झाल्यानंतर नातेवाईकांकडे तात्पुरता आसरा घेतला, पण "किती दिवस दुसऱ्याच्या घरात राहायचे?" असा संताप व्यक्त करत सौ. फेसरडा यांनी अखेर आपला संसार, घरातील सर्व साहित्य, पती आणि मुलासह स्वातंत्र्य दिनी थेट पंचायत समिती विक्रमगड येथे धडक मारली.

या अगोदर त्यांनी जिल्हाधिकारी पालघर, जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी वाडा, तहसीलदार विक्रमगड, गटविकास अधिकारी विक्रमगड आणि ग्रामसेवक वेढे यांच्याकडे वारंवार अर्ज व विनंती करून पाठपुरावा केला. मात्र, निवाऱ्याची सोय न झाल्याने सामाजिक कार्यकर्ते बळवंत गावित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी स्वातंत्र्य दिनीच गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात हजेरी लावली.

सकाळी ११ वाजता झालेल्या या प्रकारात गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, पंचायत समितीचे इतर अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक मा. गोळे यांच्या उपस्थितीत चर्चा झाली. अखेर वेढे ग्रामपंचायतीच्या जुन्या कार्यालयात सौ. फेसरडा यांना तात्पुरता निवारा देण्याचा निर्णय घेण्यात आला, जोपर्यंत त्यांचे घरकुल पूर्ण होत नाही.

या वेळी जव्हार तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संपत पवार, युवा कार्यकर्ते नितीन मुकणे, विक्रमगड तालुका आदिवासी काँग्रेस अध्यक्ष साईनाथ रावते, पंढरीनाथ गोवारी, रवींद्र जाधव, विलास बरड, मधुकर धोदडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी कुटुंबाच्या मदतीला धाव घेतली. तसेच लोकमतचे पत्रकार संजय दादा नेवे, 'चालू भारत'चे सुधीर घाटाळ, 'महाराष्ट्र लाईव्ह न्यूज'चे शैलेश तांबडा, लोकमतचे विजय पटेल यांनी घटनास्थळी येऊन सामाजिक बांधिलकी जपत आधार दिला.

नयना फेसरडा यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर संताप व्यक्त केला "पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की ज्याचं घर कच्च्या पत्र्याचं आहे त्याला घरकुल मिळेल. पण माझ्यासारख्या गरीब आदिवासी महिलेला, ज्याचं घर अर्धवट आहे, त्याला दुसरा हप्ता देऊन घर पूर्ण करायला सरकारकडे वेळ नाही. अधिकारी वर्ग आणि ग्रामविकास विभाग जाणूनबुजून वंचित ठेवत आहेत. स्वातंत्र्याच्या 79 वर्षांनंतरही आम्हाला जगण्यासाठी लढावे लागत आहे. हा कशाचा स्वातंत्र्यदिन?"

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा गाजावाजा करताना एकीकडे देश विकसित होत असल्याचा दावा केला जातो; पण दुसरीकडे देशाचे खरे मालक असलेल्या आदिवासी बांधवांना आजही मूलभूत हक्कांसाठी दारोदारी भटकावे लागत असल्याची ही घटना सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीवर मोठा प्रश्नचिन्ह उभा करते.

## मच्छिमार नौकेचा अपघात



**पालघर :** समुद्रात 'श्री साई' या मच्छीमार नौकेला १४ऑगस्ट रोजी रात्री एका मोठ्या लाल रंगाच्या मालवाहू जहाजाने जोरदार धडक दिली. या घटनेची माहिती मिळताच 'जय साईप्रिया' आणि 'जय साईराम' या दोन बोटींनी अपघातग्रस्त नौकेला वेळेवर मदत पोहोचवली.१४ ऑगस्ट रोजी रात्री ९.२५ च्या सुमारास 'श्री साई' नौका समुद्रात असताना एका मोठ्या लाल रंगाच्या मालवाहू जहाजाने तिला धडक दिली. या धडकेने बोटीवरील १५ पैकी चार खलाशी समुद्रात फेकले गेले. काळोख असल्याने त्यांना कसेबसे जीवरक्षण करत पुन्हा बोटीजवळ येणे शक्य झाले. या अपघातात 'श्री साई' बोटीचे मोठे नुकसान झाले असून, ती दोन तुकड्यांमध्ये तुटण्याची शक्यता निर्माण झाली होती. सुदैवाने वेळेवर मिळालेल्या मदतीमुळे सर्व खलाशांचे प्राण वाचले आणि मोठा अनर्थ टळला.

# अंमली पदार्थविरोधी अभियान अंतर्गत प्रभात फेरीचे आयोजन

■ तलासरी

सध्या जिल्ह्यात व पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/08/2025 ते दिनांक 17/8/2025 अंमली पदार्थ विरोधी अभियान अंतर्गत जनजागृती करण्यात येत आहे तलासरी पोलीस ठाणे हद्दीत पोलीस अधिकारी व अंमलदार सोशल मिडिया माध्यमातून गावभेट दरम्यान नागरिकांमध्ये, कंपनीचे कामगार मध्ये जाऊन जनजागृती करण्यात येत आहेत.निबंध स्पर्धा ही घेण्यात आल्या आहेत.अंमली पदार्थ विरोधी अभियान अंतर्गत शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यालय तलासरी या शाळेची जनजागृती अनुषंगाने प्रभात फेरी काढण्यात आली होती.त्यामध्ये Say no to Drugs, नाशा नाही - दिशा हवी, अंमली पदार्थ थांबवा



- जीवन वाचवा, अंमली पदार्थ सोडा - कुटुंबाचे हास्य जपा व इतर यांचे फ्लेक्स, बॅनर घेऊन अंमली पदार्थ दुष्परिणाम च्या अनुषंगाने घोषणा देऊन विद्यार्थी व नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली

सदर अंमली पदार्थ जनजागृती अभियान यशस्वी करण्याकरिता पोलीस अधीक्षक, यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती अंकिता कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय गोरड व पोलिस अधिकारी आणि अंमलदार करीत आहेत.

# सईबाई कोलेकर यांचे निधन



**मुंबई:** सहाय्यक पोलिस आयुक्त शिवाजीराव कोलेकर यांच्या पत्नी आणि शेकापचे गडहिंग्लज नेसरीचे माजी आमदार दिवंगत तुकाराम कृष्णाजी कोलेकर यांच्या स्नुषा सईबाई शिवाजीराव कोलेकर(६२)यांचे मालाड इथे अल्पशा आजारामुळे निधन झाले ,त्यांच्या पश्चात मुलगा चेतन मुलगी अंकिता असा परिवार आहे ,गोरेगाव येथील आरे स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मुंबई पोलिस दलातील वरिष्ठअधिकारी,नेसरीच्या कसबा शिक्षण समितीचे पदाधिकारी,मालाडच्या प्रमुख राजकिय पक्षाचे पदाधिकारी , मित्रमंडळी,मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते .

**PUBLIC NOTICE**

**TAKE NOTICE THAT** my clients i.e. MR. ATUL ASKARAN AGARWALA & SMT. RADHA ASKARAN AGARWALA. are the owners and having the right, title and interest in respect of the Office No. 312, admeasuring 254 sq. ft. carpet area, 3rd floor, of the Building "Arun Chambers" society known as Arun Commercial Premises Co-operative Society Limited., situate at CTS No. 730 (Part) 731 (Part) of Malabar Hill Cumballa Division lying and being and situate at Tardeo Main Road Mumbai-400034 within the Registration District of Mumbai City (hereinafter referred to as the said office premises). That following title documents are missing in respect of the said office premises:

1. Original title Agreement/s from developers/ builder in favour of Mrs. Kamlavati M. Kothari and others.
2. Original Agreement between Mrs. Kamlavati M. Kothari and others., and M/s J.S. Arora and sons.

Any person who has received and or found the above documents in respect of the said premises is hereby requested to kindly return the same at the address below mentioned. Also, if anybody having objections in respect of the Title of the said premises, can also note their respective objections within 7 days at the address below mentioned.

Dated 16th AUGUST 2025. sd/-

**ATHARVA ANIL KADAM**
**ADVOCATE**
Address Room No. 168,
4th Floor, India United Mills Building,
Dr. Babasaheb Ambedkar Road,
Parel, Mumbai 400012
Mobile 9167197876.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Thirty
Issu - 57
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- तीसावे
अंक - ५७
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

मुंबई:महाराष्ट्रातील महार वतन इनामी जमिनीबाबत समाजाची झालेल्या फसवणुकीविरोधात महार वतन हक्क सेवाभावी प्रतिष्ठान अध्यक्ष आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) दीपक निकाळजे गटाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशिकांत दारोळे हे ६ ऑगस्ट पासून आझाद मैदानात बेमुदत आमरण उपोषण करत आहेत. पण अजून कुणाही संबंधितांनी त्याची दखल घेतलेली नाही. त्यांच्या प्रमुख मागण्या सर्व महार वतन जमिनीवरील अनधिकृत खरेदी - विक्री व्यवहार रद्द करावे, अनधिकृतपणे नोंदणी झालेले साठेखत आणि कुलमुखत्यारपत्रे रद्द करावी., महार वतन जमिनीवरील सर्व अनधिकृत अतिक्रमणे काढावी., अनधिकृत व्यवहार रद्द करून मूळ महार वतन जमिनीवर असलेले कुळ हटवून ती मूळ महार वतनदारांना हस्तांतरित करावी. आणि कुळ मुखत्यारपत्राद्वारे झालेलं खरेदीखत जिल्हाधिकारी यांनी दिलेली हस्तांतरण परवानगी रद्द करावी.




## जोरदार पावसात पुन्हा मुंबईची तुंबई

# विक्रोळीत दरड कोसळून बाप-लेकीचा मृत्यू; भरपावसात गोविंदाचे 'ढाकुम माकूम' जोरात

प्रतिनिधी
■ मुंबई

स्वप्ननगरीत रात्रभर कोसळलेल्या पावसानं मुंबईची पार तुंबई केली आहे. मुंबई परिसरातील विक्रोळी उपनगरात दरड कोसळून दोघांचा मृत्यू झाला. ही घटना शनिवारी पहाटे अडीच वाजताच्या सुमारास घडली. सुरेश मिश्रा (५०) आणि शालू मिश्रा (१९) असं दरड कोसळून ठार झालेल्या दोघांची नावं आहेत. हे दोघं बाप आणि मुलगी असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तर आरती मिश्रा ( ४५ ) आणि ऋतुराज मिश्रा (२०) या दोघांवर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असंही महापालिकेच्या सूत्रांनी सांगितलं. दरम्यान मुंबईतील अंधेरी, कुर्ला, चेंबूर परिसरातील सखल भागांत पाणी साचलं आहे. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार शहरात मध्यरात्री १ ते पहाटे ४ वाजेपर्यंत विक्रमी पाऊस पडला.





मुसळधार पावसामुळे मुंबईतील विक्रोळी परिसरातील वर्षानगरमध्ये भूस्खलन झालं आहे. या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागानं दिली आहे. महापालिकेच्या माहितीनुसार, सदर घटना मध्यरात्री २:३९ वाजता घडली असून, अग्निशामन विभागाकडं सकाळी ५ .५० वाजता ही दुर्घटना नोंदवली. डोंगराळ भागातून माती आणि दगड घसरून एका झोपडीवर पडले. या अपघातात चार जण जखमी झाले. जखमींना राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. यात उपचारादरम्यान दोघांचा मृत्यू झाला. १९ वर्षीय शालू मिश्रा आणि ५० वर्षीय सुरेश मिश्रा अशी मृतांची नावं आहेत. तर आरती मिश्रा (४५) आणि ऋतुराज मिश्रा (२०) यांना ट्रॉमा वॉर्डमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती महापालिकेनं दिली आहे. वर्षा नगरमधील हा डोंगराळ परिसर घनदाट लोकवस्तीने भरलेला आहे आणि अशा घटना या भागात वारंवार घडत असतात. सतत होणाऱ्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अपघातानंतर महापालिका प्रशासन व आपत्कालीन बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आणि मलबा हटवून परिसरातील इतर घरे तातडीने रिकामी करण्यात आली आहेत.

### पावसातही गोविंदांचे थरांवर थर

शुक्रवारी रात्रीपासून मुंबईत पावसाची मुसळधार बॅटिंग सुरू आहे. काही ठिकाणी सखल भागातील रस्ते पाण्याखाली गेले असून, काही ठिकाणी घरात पाणी शिरल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शुक्रवारी सायंकाळपासून मुंबईत पाऊस सुरू आहे. मध्यरात्री पावसाचा जोर वाढला. मुसळधार पावसामुळे अंधेरी, कुर्ला, चेंबूर परिसरातील सखल भागांत पाणी साचलं आहे. महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माहितीनुसार, मध्यरात्री १ ते पहाटे ४ वाजेपर्यंत विक्रमी पाऊस पडला आहे. रात्री जन्माष्टमीनंतर आज मुंबईत सर्वत्र मोठ्या उत्साहात दहीकाला साजरा केला गेला या दहीहंडीच्या आधीच पहाटेपासूनच मुंबईत मुसळधार पाऊस पडला. मुंबईत पावसाच्या सरी अधूनमधून येतच होत्या.पण त्यातूनही मुंबई आणि परिसरातील गोविंदाचा उत्साह मात्र कमी झालेला दिसला नाही.गोविंदांनी या पावसातच थरांवर थर लावत आपल्या असीम जिद्दीचे दर्शन घडवले. भर पावसातही ढाकुम माकूमच्या तालात गोविंदा पथके मुंबईत दहीहंड्या फोडण्यासाठी उत्साहात फिरताना दिसत होती.

# लाडक्या चिंतामणीच्या आगमनासाठी भक्तगण आतुर

प्रतिनिधी
■ मुंबई

### आज रविवारी होणार चिंचपोकळीच्या बाप्पाचे आगमन



मुंबईतील १०५ वर्षे जुन्या गणेशमंडळाच्या मूर्तीची पहिली झलक पाहण्यासाठी लोक उत्सुकतेने वाट पाहत आहेत. चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाची स्थापना १९२० मध्ये करण्यात आली. मुंबईकरांची प्रतीक्षा जवळजवळ संपली असून बहुप्रतिक्षित चिंचपोकळीचा चिंतामणी आगमन सोहळा रविवार, १७ ऑगस्ट रोजी होणार आहे. जो मुंबईतील सर्वात प्रतिष्ठित गणेशमूर्तींपैकी एकाच्या भव्य आगमनाचे प्रतीक आहे. दरवर्षी, लाखो भाविक त्यांच्या लाडक्या 'चिंतामणी'ची पहिली झलक पाहण्यासाठी चिंचपोकळी इथे येतात. ज्यांचे भव्य आगमन हे दृश्य आणि आध्यात्मिक दृश्यापेक्षा कमी नसतं. पुन्हा तोच उत्साह, पुन्हा तोच जल्लोष आणि पुन्हा तोच अनुभव घेण्याचा तो क्षण जवळ आला आहे.

यावर्षीचा चिंचपोकळीचा चिंतामणी हा छत्रपती संभाजी महाराजांवर आधारित आहे. ज्यामध्ये सिंहासनावर विराजमान असलेली मूर्ती राजेशाही मराठा वैभवाचे प्रतिबिंबित करते. चिंतामणीची उंची ही सुमारे २१ ते २२ फूट आहे. चिंतामणी पंडालने भव्य प्रवेश मिरवणुकीची १७ ऑगस्ट होणार आहे. ज्यामुळे गणेश चतुर्थी २०२५ च्या उत्सवाची सुरुवात पूर्ण उत्साहात होणार आहे. त्याच्या उंच मूर्ती आणि उत्साही ढोल-ताशा पथकांसाठी ओळखले जाणारे, चिंचपोकळीचा चिंतामणी आगमन हे शहरातील उत्सव एक आकर्षण असतं. यंदा चिंतामणीच्या आगमन सोहळा 17 ऑगस्ट 2025 ला सकाळी 10 ते दुपारी 12 वाजेच्या दरम्यान सुरुवात होऊ शकते. मंडळाकडून कुठलही अधिकृत वेळ सांगण्यात आलेली नाही.

गणेश चतुर्थी २०२५ बुधवार, २७ ऑगस्ट असून शहर आधीच १० दिवसांच्या उत्सव, भक्ती आणि एकतेसाठी सज्ज झाले आहे. हा उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात भव्यतेने साजरा केला जातो, उत्साही सजावट, सामुदायिक मेळावे आणि " गणपती बाप्पा मोरया " च्या जयघोषाने वातावरण दुमदुमून जाते.

### असं असेल चिंतामणीच्या आगमनासाठीचे प्लॅनिगं!

चिंतामणी कलागंध आर्ट्स, परळ मंडपातून बाहेर येईल त्यानंतर बी ए मार्गावर येईल, रुग्णवाहिनीची व्यवस्था, पोलीस व्यवस्था आणि लाइव्हची व्यवस्था करण्यात आली आहे. आगमन सोहळ्यात होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ११ टॉवरची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासोबत ५ मेडिकल कॅम्प असणार आहे. यात दोन डॉक्टर चार नर्स असणार आहे. तसंच ७ -८ रुग्णवाहिनी असणार आहे. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चिंतामणी मंडळाचे ६०० कार्यकर्ते असणार आहे. १७ ऑगस्ट २०२५ पासून भाविकांना दर्शन घेण्याची परवानगी दिली जाईल. भाविकांना सकाळी ६ ते दुपारी २ आणि संध्याकाळी ४ ते रात्री १० पर्यंत दर्शन घेता येईल.

# मानखुर्दची धक्कादायक घटना दहीहंडीची रस्सी बांधताना तोल गेला, गोविंदाचा मृत्यू

प्रतिनिधी
■ मुंबई

### ३० गोविंदा जखमी ,१५ जणांना डिस्चार्ज

राज्यात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला गेला. अशातच महाराष्ट्र नगर मानखुर्द येथे दही हंडीची रस्सी बांधताना खाली पडून एकाचा मृत्यू झाला आहे. दही हंडीची रस्सी बांधताना बाल गोविंदा पथकाचा एक सदस्य खाली पडला होता, लगेज त्याला गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र भर्ती करण्याच्या पूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. जगमोहन शिवकिरन चौधरी (३२ ) असं या गोविंदाचे नाव आहे.

दहीहंडी उत्सवातील जखमी गोविंदांची माहिती विविध सरकारी आणि बीएमसी रुग्णालयांनी दिली आहे. यानुसार दुपारी ३ वाजेपर्यंत ३० गोविंदा जखमी झाले असल्याचे समोर आले आहे. मुंबईत आतापर्यंत ३० गोविंदा जखमी, १५ जणांना डिस्चार्ज तर १५ जखमींवर उपचार सुरू आहेत

याआधी रविवारी दहिसर परिसरात दहीहंडीच्या सरावादरम्यान एका ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. हा मुलगा सहाव्या थरावर उभा होता, मात्र अचानक संतुलन बिघडल्याने तो खाली पडला, त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. दरम्यान दहीहंडीचा हा सराव परवानगीशिवाय सुरु होता अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

**मुंबई शहर** – जखमी १८ ; उपचार सुरू १२ , डिस्चार्ज – ६
**मुंबई पूर्व उपनगर** – जखमी ६ ; उपचार सुरू ३ , डिस्चार्ज ३
**मुंबई पश्चिम उपनगर** – जखमी ६ ; उपचार सुरू १ , डिस्चार्ज ५
**एकूण – ३० जखमी; उपचार सुरू- १५ ; डिस्चार्ज १५**

### केइएम रुग्णालयात गोविंदासाठी विशेष उपचाराची सोय

मुंबईच्या के ए एम रुग्णालयात जखमी गोविंदासाठी विशेष उपचाराची सोय करण्यात आली आहे. विशेष डॉक्टरांची टीम जखमी गोविंदांसाठी सज्ज आहे. आज सकाळ पासून एकूण २२ जखमी गोविंदाना उपचारासाठी आणण्यात आले आहे.यातील २१ जखमी गोविंदाना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.

# महावितरणच्या भांडूप परिमंडलात 79 वा स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

महावितरणच्या भांडूप परिमंडल कार्यालयात ७९ स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा करण्यात आला. भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी, सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले) प्रवीण रहांगदळे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा सं) सौ. नमिता गजदर, कार्यकारी अभियंता, श्रीनिवास चटलावार, कार्यकारी अभियंता, प्रवीण काळे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महेंद्र बागुल, प्रणाली विश्लेषक, सौ. कीर्ती जोशी व इतर वरिष्ठ अधिकारी व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.



४५ व ४६ व्या अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाचा स्पर्धेत सहभागी होऊन वैयक्तिक/ सांघिक क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य संपादन केल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधीतून उत्कृष्ट खेळाडूंना रोख रक्कम देऊन त्यांच्या सत्कार मुख्य अभियंता भांडुप परिमंडल संजय पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर, परिमंडल कार्यालयच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. भांडुप परिमंडलातील ठाणे, वाशी व पेण या तिन्ही मंडळ कार्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त रॅली व ग्राम सभाचे आयोजन करण्यात आले होते ज्यामध्ये पी एम सूर्यघर मोफत वीज योजना व सौर कुसुम योजनेचा जागर करण्यात आला. यामध्ये ग्राहकांनी सहभागी होऊन उत्तम प्रतिसाद दिला.



**मुंबई:** देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या पुण्यतिथीनिमित्त शनिवारी कांदिवली-पूर्व येथील क्रीडा संकुल येथे त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी उत्तर मुंबईचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी चारकोपचे आमदार योगेश सागर, उत्तर मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष दीपक उर्फ बाळा तावडे पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# बेस्ट कामगार हे मुंबईचे वैभव होते, त्यांच्या आयुष्यात सुख-समाधान आणू - प्रवीण दरेकर

प्रतिनिधी
■ मुंबई

### कप बशीला मतदान करून २१ च्या २१ जागा निवडून आणण्याचेही केले आवाहन




बेस्ट कामगार हे मुंबईचे वैभव होते. नारायण राणे, विठ्ठल चव्हाण असतील पक्षासाठी बेस्ट कामगारांनी काय मेहनत घेतली ती मला माहित आहे. शिवसेनेला मोठे करण्यात बेस्ट कामगारांचा खारीचा वाटा आहे. ज्या नेत्यांनी आपल्याला घडवले, वाढवले त्या नेत्यांकडे लक्ष नाही तर गरीब बेस्ट कामगारांकडे यांचे काय लक्ष राहणार. यांचे लक्ष मोठ्यांकडे आहे. मोठा असूनही छोट्यांसाठी काम करणारा प्रसाद लाड आपला नेता आहे. दोन दिवस मेहनत घ्या. पाच वर्ष प्रसाद लाड यांच्या खांद्याला खांदा लावून तुमच्या आयुष्यात सुख, समाधान आणण्याचा प्रयत्न करू, असा शब्द भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी शुक्रवारी पार पडलेल्या दि बेस्ट एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या जाहीर मेळाव्यात दिला. तसेच कप बशीला मतदान करून समृद्धी पॅनेलच्या २१ च्या २१ जागा निवडून आणण्याचे आवाहनही त्यांनी कामगारांना केले.

या मेळाव्याला समृद्धी पॅनलचे सर्वेसर्वा आमदार प्रसाद लाड, मुंबई बँकेचे संचालक नंदकुमार काटकर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष रामदास मोरे, समर्थ बेस्ट कामगार संघटना, बेस्ट राष्ट्रीय कर्मचारी सेना, दि इलेक्ट्रिक युनियन, एससी-एसटी वेल्फेअर असोसिएशन आणि बहुजन एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कामगारांना संबोधित करताना आ. दरेकर म्हणाले कि, देश स्वतंत्र १५ ऑगस्टला झाला आणि बेस्ट कामगार हा १८ ऑगस्टला स्वतंत्र होणार आहे. परिवर्तन करण्याचे काम व कामगारांच्या आयुष्यात समृद्धी आणण्याचे काम हे कामगार १८ तारखेला करणार आहेत. ही निवडणूक बेस्ट कामगारांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे. २५ वर्ष या पतपेढीचे नेतृत्व बेस्ट कामगार सेनेने केले. त्यांनी या पतपेढीच्या माध्यमातून चांगल्या दोन योजना आणल्याचे सांगितले तर आम्ही ही निवडणूकच लढणार नसल्याचे दरेकर म्हणाले.

### बेस्ट कामगारांना कमी व्याज दरात पैसे उपलब्ध करून देऊ !

दरेकर म्हणाले कि, बेस्ट कामगारांना हक्काचे घर देण्यासाठी प्रसाद लाड यांचे प्रयत्न सुरु आहेत. तुम्ही काय केलात क्षणभर विश्रांती. तुम्ही कामगारांच्या कष्टाच्या, घामाच्या पैशावर ऐय्याशी मारलात. ही ऐय्याशी संपवून टाकणारी निवडणूक आहे. मुंबई बँक आमची आहे, कर्मचाऱ्यांची आहे. त्यांनी सभासद म्हणून आमच्या ताब्यात दिली आहे. त्यांचा पालक म्हणून सांगतो कामगारांना कमीत कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देऊ. विरोधकांकडे अजेंडा, योजना नाहीत. आमच्याकडे योजना आहेत. या सर्व कामगारांना मेडिक्लेम दिल्याशिवाय राहणार नाही. ही निवडणूक झाल्यावर बेस्ट एम्प्लॉईज पतपेढी व मुंबई बँक यांच्यात एमओयू करू आणि एकत्रितपणे घरासाठी पैसे उपलब्ध करून देऊ.

### बेस्ट कर्मचारी कामगार सेनेचा बँड वाजविल्याशिवाय राहणार नाही

दरेकर म्हणाले कि, तेजस्विनी घोसाळकर यांच्या पतीचे निधन झाले म्हणून त्यांची सन्मानाने मुंबई बँकेच्या संचालक पदी निवड केली. यांना भगवे झेंडे फडकवायचे आहेत. विचार गहाण ठेवून काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले आणि भगव्याच्या गोष्टी करताहेत. खरे म्हणजे मनसेचे आश्चर्य वाटतेय. मनसेचे दोन उमेदवार घेतलेत. राज ठाकरे व मनसेला घेतले नाही तर आपले डिपॉझीट जप्त होईल कि काय अशी भीती बेस्ट कामगार सेनेला आहे. म्हणून १८ वर्ष त्यांना वाळीत टाकले होते. आता ब्रँड नावाने पुढे आले. परंतु बेस्ट कर्मचारी या बेस्ट कामगार सेनेचा बँड वाजविल्याशिवाय राहणार नाही. कप बशी आपली निशाणी आहे. २५ वर्ष ही निशाणी घेऊन लढतोय. एकदाही हरलो नाही. ही निवडणूकही जिंकायची आहे. लागेल ती ताकद मुंबई बँक आणि सरकार केल्याशिवाय राहणार नाही, असा शब्दही दरेकरांनी यावेळी कामगारांना दिला .

# महाराष्ट्र डाक सर्कलचा शोलेच्या सुवर्णमहोत्सवाला आगळा 'सॅल्यूट'

प्रतिनिधी
■ मुंबई

### पिक्चर पोस्टकार्ड आणि प्रेझेंटेशन पॅकचे अनावरण



१५ ऑगस्ट १९७५ रोजी रिलीज झालेल्या शोले या चित्रपटाच्या मूळ प्रदर्शनाला आज ५० वर्षे पूर्ण झाली. जी.पी. सिप्पी द्वारा निर्मित या चित्रपटाने सिने जगतात आपले एक विशेष स्थान निर्माण केले आहे. या निमित्त भारतीय डाक विभाग, महाराष्ट्र पोस्टल सर्कल तर्फे आज दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी एका भरगच्च कार्यक्रमात एका विशिष्ठ स्पेशल कॅन्सलेशन सह विशिष्ठ पिक्चर पोस्टकार्ड आणि एक प्रेसेंटेशन पॅक चे विमोचन करण्यात आले. महाराष्ट्र डाक सर्कलचे मुख्य पोस्टमास्टर जनरल अमिताभ सिंह यांनी अधिकृतपणे या स्मरणीय वस्तूंचे अनावरण केले व शोलेचे प्रशंसित दिग्दर्शक रमेश सिप्पी यांना पहिला अल्बम सादर केला.

या प्रसंगी शहजाद सिप्पी, रोहन सिप्पी, श्रीमती किरण जुनेजा सिप्पी आणि शिवेंद्र सिंग डुंगरपूर उपस्थित होते तसेच मोठ्या संख्येने फिलॅटेलीस्ट आणि मीडिया चे प्रतिनिधी व शोलेचे चाहते उपस्थित होते.या प्रसंगी भारतीय डाक विभागाचे वरिष्ठ डाक अधिकारी, श्रीमती केया अरोरा, निदेशक, डाक सेवा (मुंबई क्षेत्र), सुश्री सिमरन कौर, निदेशक (मुख्यालय), डाक सेवा, महाराष्ट्र सर्कल आणि मुंबई जी.पी.ओ. च्या संचालिका श्रीमती रेखा रिझवी देखील उपस्थित होत्या.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने तिकीट शोलेचे चाहते उपस्थित होते. प्रदर्शनाच्या पाच दशकांनंतरही शोलेने भारताच्या सांस्कृतिक आणि चित्रपट वारशात आपले एक विशेष स्थान कायम ठेवले आहे.त्याला भारतीय टपाल विभागाने आगळा सॅल्यूट दिला आहे.

# मुंबईतील आशा सेविकांचा निवडणुकीचे काम करण्यास नकार

प्रतिनिधी
■ मुंबई


मुंबई महानगरपालिका विभागाअंतर्गत काम करणाऱ्या एनएचएम आणि बीएमसी आशा अत्यंत महत्वाची व अत्यावश्यक सेवा देत असून तळागाळापर्यंत आरोग्य सेवा पोहचवण्याचे अत्यंत महत्वाचे काम त्या बीएमसी प्रशासनासाठी करतात. सध्या पावसाळा सुरू असून मुंबईत अनेक ठिकाणी साठलेले पावसाचे पाणी व तुंबलेल्या गटारी यांमुळे अतिसार, मलेरिया, डेंग्यु आदी साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे. एरवी देखील सर्व प्रकारचे आजार व रोग यांनी ग्रस्त रुग्ण शोधून काढून त्यांना आरोग्य केंद्रापर्यंत आणणे किंवा त्यांची माहिती आरोग्य केंद्राला देणे हे काम त्या करत असतात. विविध रोगांच्या प्रादुर्भावाचे सर्वेक्षण देखील त्यांना वेळोवेळी करावे लागते. आशांना रोज साधारणपणे ६ ते ७ तास काम करावे लागते व त्या त्यांच्या सर्व कामांमध्ये व्यस्त असतात. शिवाय त्यांना आपल्या कुटुंबाची देखील जबाबदारी पार पाडावी लागते. त्यामुळे त्या आरोग्य सेवा व निवडणुकीचे काम ही दोन्ही कामे करू शकणार नाहीत. अशा वेळी निवडणुकीसारख्या नैमित्तिक कामामध्ये त्यांना गुंतवल्यास त्यांच्या आरोग्य सेवेच्या मूळ कामावर विपरीत परिणाम होऊन मुंबईत साथीचे आजार बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महत्त्वाच्या कारणांमुळे आशांनी निवडणुकीत बीएलओ म्हणून काम करण्यास नकार दिला आहे व तसे निवेदन पालिका प्रशासनाला दिले आहे.

या शिवाय आशांची मतदान स्तरीय अधिकारी- बीएसओ म्हणून केलेली नेमणूक कायद्याला धरून नाही. कायद्याच्या कलम १३ ब (२) नुसार बीएलओ शासकीय कर्मचारी, निमशासकीय अधिकारी किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकृत अधिकारी असला पाहिजे. आशा या शासकीय, निमशासकीय कर्मचारी किंवा बीएमसीच्या अधिकारी नाहीत. आशा या बीएमसीच्या कायम स्वरुपी कर्मचारी नसून आरोग्य सेवेच्या विशिष्ट कामासाठी नेमलेल्या व केलेल्या कामाच्या मोबदल्यावर काम करणाऱ्या कर्मचारी आहेत. त्या कंत्राटी किंवा मानधनी कर्मचारी देखील नाहीत. त्या अत्यंत गरजू असून त्यांच्या आशा म्हणून केलेल्या कामाच्या मोबदल्याची त्यांना गरज आहे. निवडणुकीचे काम व त्याचा मोबदला दोन्ही गोष्टींमध्ये नियमितता नाही. त्याचा मोबदला सुद्धा वेळेवर मिळत नाही. त्यामुळे आशा म्हणून मिळणारा मोबदला सोडून अशा कामासाठी वेळ देणे त्यांना परवडणार नाही. या सर्व कारणांमुळे त्यांना बीएलओ सहित कोणत्याही प्रकारच्या निवडणुकीच्या संदर्भातील काम देण्यात येऊ नये व त्यांना त्यांच्या आरोग्य सेवेच्या कामावर लक्ष केंद्रित करण्याची मुभा द्यावी. सर्व आशांना बीएलओच्या आदेशपत्रामधून वगळण्यात यावे व ज्यांना आदेश दिले गेले आहेत ते रद्द करावेत असे त्यांनी पालिका प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



*मुंबई: मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय हास्य जत्रा अभिनेते अरुण कदम यांच्या उदंड प्रतिष्ठान आणि वैशाली फाउंडेशन च्या वतीने सांताक्रुज खार येथे दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवामध्ये अनेक मंडळाच्या दहीहंडी पथकानी सहभाग नोंदवला.राहुल रुके,चेतन मोहिते, मयुरेश जाधव, गौरव जाधव, रुपेश जाधव, अमोल मोरे, नरेश रुके, गौरंग महाडिक, प्रकाश जाधव, वैभव पवार, अमित शिर्के आधी कार्यकर्त्यांनी या दहीहंडीच्या उत्सवाच्या आयोजना नियोजनाची कामगिरी पार पाडली.*

आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं ते खरं स्वप्न असतं.



- डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

वृत्तमानस

मुंबई, रविवार, १७ ऑगस्ट २०२५




**१७-०८-२०२५ ते २३-०८-२०२५ (रविवार ते शनिवार)**

**मेष - यशस्वी वाटचाल करु शकाल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व दिवस आनंदी-चांगलेआहेत. सर्वस्तरावर चांगल्या गोष्टींची अनुकूलता वाढवु शकाल. कोणत्याही गोष्टीची काळजी करण्याची गरज भासणार नाही.गोष्टीचा श्री गणेशा सप्ताहात होणार आहे. इतरांचि मदत वेळेवर मिळु शकेल.संघर्ष करावा लागत होता.तो आता करावा लागणारनाही.२०चा कर्केतुन शुक्रबदल उत्तम.स्वभावातला केलेलाबदल पोषक राहु शकेल. उत्साह वाढु शकेल.व्यवसायात मोठा फायदा होऊ शके ल.नोकरदार कामात पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.
**महिला -** आर्थिक बाबतीत उत्तम सफलता मिळु शकेल. शेजाऱ्यांना मदत कराल.धार्मिककार्यात सहभाग राहील. आनंदी सप्ताह असल्याने मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-१८-१९-२०.**

**वृषभ - खर्च कमी करावे लागतील.**
ग्रहसंकेतपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना चांगले यश मिळवु शकाल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वा कोणतेही महत्त्वाचे काम करताना दूरदृष्टीपणा ठेवावा लागेल.स्वत:ची जबाबदारी इतरांवर टाकून चालनार नाही.त्यामुळे कदाचित नुकसान होऊशकते.सामाजिक कामे करतांना वादविवाद टाळावे लागतील. प्रत्येक गोष्टीत संयम ठेवने अधिक पोषक राहु शकेल.समोरच्याने एखादा सल्ला दिला तर तो ऐकून घ्यायला काही हरकत नाही. शुक्रबदल चांगले यश देऊ शके ल.व्यवसायात अविचाराने गुंतवणूक टाळत रहाने बरे. नोकरदार कामात लक्ष द्यावे लागेल.नियोजन करावे.
**महिला -** आर्थिकस्तर बर्यापैकी समाधान देऊशकेल.आळस कमी करने पोषक राहु शकेल.वायफळ खर्च वेळिच कमी करावे लागतील. जोडीदाराची साथ मिळु शकेल.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभ दिनांक-२०-२१-२२.**

**मिथुन - संयम वाढवने बरे राहील.**
ग्रहसंकेत पहाता प्रतिकुल सप्ताह जानार आहे.नियोजित कामे करतांना जास्त अपेक्षा बाळगु नका.आहे त्यात कामे करत रहावे.कोनतेही कामे करतांना नियम चौकटीतच राहुन करावे लागतील.असे हे दिवस सतर्क राहून कामे करावीत.घाईगडबडीने केलेली कोणतीही गोष्ट अंगलट येऊ शकते.त्यामुळे विचार करूनच निर्णय घ्यावे लागतील.इतरांच्या वैयक्तिक गोष्टीत अजिबात हस्तक्षेप करूनका."आपले काम भले निआपण भले"असेच वातावरण ठेवा.दिवस अनुकूलनाही.शुक्रबदल अतिरिक्तखर्च वाढवील.व्यवसाय नको तो व्याप वाढवुन घेऊ नका. उगीचच त्रास वाढु शकेल.नोकरदार कामातील त्रुटी वेळीच दूर करणे बरे.
**महिला -** विनाकारण दडपन घेऊन अडचनी वाढवु नका.यशासाठी प्रयत्न सुरू करा.वायफळ खर्च वेळिच सांभाळावे लागतील.कुटुंब काळजी घ्यावी.वाद टाळावेत.
**विद्यार्थी -** स्वत:च्याआरोग्याकडेही लक्ष द्यावे.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**कर्क - व्यवहार जपुन करावेत.**
ग्रहसंकेत पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना यशात वाढ होऊ शकेल.या सर्व दिवसांचा कालावधी चांगला कसा घालवता येईल ते प हात चला.कोणत्याही कामाचे नियोजन केल्याशिवाय ते काम करू नका.नाहीतर ज्यादा कामाचा व्याप वाढु शके ल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना वेळेचे बंधन पाळावे लागेल. जबाबदारीतून मोकळे होण्यासाठी घाई करून काम करायचे ठरवल्यास ते काम लांबणीवर जाऊ शकेल.आळशी वृत्ती बाजूला ठेवावी. शुक्रबदल पोषक राहील.व्यवसायात कामे करतांना तोंडी व्यवहार टाळने बरे राहील. नोकरदार वरिष्ठांचे काम ताबडतोब करून द्यावे लागेल.
**महिला -** आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनने बरे राहील.मित्र-मैत्रिणींशी वैचारीक सलोखा चांगला वाढेल.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल.घरगुती वातावरण चांगले राहु शकेल.
**विद्यार्थी -** आरोग्य जपत चला.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

**सिंह - लाभ वाढतील.**
ग्रहबळपहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.ग्रहाचे भ्रमण सुखकर असेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना सर्व कामे अगदी ठरवून ठेवल्याप्रमाणे होत राहतील.त्यामुळे कोणत्याही कामाचा कंटाळा येणार नाही.प्रत्येक कामात उत्साह वाटु लागेल.इतरांनी मदत करावी ही अपेक्षा तुमच्या मनामध्ये येणार नाही.स्वत:चे काम स्वत: पूर्ण करण्याची जिद्द तुमच्या मनामध्ये राहील आणि ती पूर्ण करु शकाल. कामाचा श्री गणेशा होईल. शुक्रबदल लाभदायक असेल.व्यवसायात देवाण-घेवाण उत्तम यशस्वी राहु शकेल. नोकरदार वर्गाचा कामाच्या ठिकाणी उत्कर्ष होऊ शकेल.
**महिला -** आर्थिक परिस्थिती चांगली असु शकेल.राजकीय क्षेत्रात शुभेच्छा मिळतील.मित्र-मैत्रिणींसोबत करमणूक होईल.आनंदी असाल. मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी -** आरोग्य उत्तम राहील.
**शुभदिनांक-१८-१९-२०.**

**कन्या - मनमानी टाळावी लागेल.**
ग्रहबळपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगलाजाऊ शकेल.नियोजितकामे करतांना यशात बर्यापैकी वाढ होऊ शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना कुटुंबाची काळजी घ्यावी लागेल.तसा या दिवसांचा कालावधी तुम्हाला जरा अस्वस्थ करणारा असु शकेल.मात्र या कालावधीत शांत डोके ठेवून काम केल्यास त्रास होणार नाही.प्रत्येक गोष्टीत घाई करून चालणार नाही.जे तुम्हाला साध्य करायचे आहे ते करण्यासाठी न जमणाऱ्या गोष्टींच्या मागेलागू नका.संधी मिळाली की सर्वगोष्टी होतात.शुक्रबदल बराराहु शकेल. व्यवसायातनवीन बदल करू नका.भांडवलाचा योग्य वापर करा.नोकरदार वर्गाचा कामासाठी वेळ जाऊ शकेल.
**महिला -** आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकतील.भावंडांची मदत मिळु शकेल.तरिसुध्दा कुटुंबाची काळजी घेतलेली बरी असेल.यशाचे गणीत जुळुन येऊ शकेल.
**विद्यार्थी -** आहार सांभाळावा लागेल.
**शुभदिनांक-२०-२१-२२.**

तूळ - वाफळ खर्च टाळावेत.
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना दगदग होऊ शकेल.वेळिच काळजी घ्यावी लागेल.या दिवसांत कोणतेही काम करताना एक घाव दोन तुकडे असे करून चालणार नाही. सध्याचे वातावरण उताराचे आहे असे म्हणायला हरकत नाही.शांत राहून कामे करावी लागतील.कोणी काय करावे आणि कोणी काय करू नये याचा सल्ला या दिवसांत कोणालाच देऊ नका. त्यामुळे गैरसमज निर्माण होऊ शकतात.जबाबदारीने वागल्यास त्रास होणार नाही. शुक्रबदल चांगलाजाऊ शकेल.व्यवसायात विनाकारण धावपळ करणे टाळनेबरे राही ल.नोकरदार वर्गाला नियमांचे पालन करावे लागु शकेल.
**महिला -** कदाचित अनपेक्षित आर्थिक लाभ होऊ शकेल. कुटुंबाशी वादविवाद टाळावे लागतील.नित्य उपासना चु कवु नये.जे आहे त्यातच समाधान मानावे लागेल.
**विद्यार्थी -** प्रकृती सांभाळावी.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**वृश्चिक - उगाच चिडचिड करु नका.**
ग्रहबळ पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम बाळगणे अधिक पोषक ठरुशकेल.कोणत्या वेळी काय बोलायचे कोणत्या वेळी काय बोलू नये याचासमज तुम्हाला या कालावधीत कदाचित राहणार नाही.त्यामुळे तुम्ही स्पष्ट भूमिका घ्याल.यामुळे चांगली असलेली परिस्थितीसुद्धा कदाचित बिघडू शकते. त्यापेक्षा डोक्यावर बर्फ तोंडात खडीसाखर असे सूत्र सध्या लक्षात ठेवावे लागेल,तरच दिवस चांगले जाऊ शक तील.शुक्रबदल बोलतांना संयम सुचवतो आहे.व्यवसायात फायदा कमी झाला तरी चालेल.नुकसान होऊ देऊनये.नोकरदार धाडसाचे निर्णय घेणे योग्य राहणार नाही.
**महिला -** कदाचितआर्थिक चणचण भासु शकेल.जरासीधावपळही होऊ शकेल.लाभात वाढ होऊ शकेल.मनमानी टाळावी लागेल. कुटुंबाशी बोलताना संयम ठेवावा.
**विद्यार्थी -** प्रकृतीकडे लक्ष द्या.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

**धनू - लाभात उत्तम वाढ होईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजितकामे करतांना घवघवीतयश मिळवु शकाल.सामाजीक कामे करतांना निरर्थक चर्चेत सहभागी होऊ नका.सामाजीक प्रतिष्ठा वाढु शकेल. कौटुंबिकस्तरावर वावरतांना आनंदीआनंद वाढत राहील.मनोरंजनातुन समाधान मिळवु शकाल.धार्मीक कामातुन पुण्य कमवु शकाल. कुटुंबासह दूरच्या प्रवासाचे उत्तम नियोजन करु शकाल.परोपकाराचे वलय सहजपणे आत्मसात करु शकाल.हो नारा शुक्रबदल मात्र बोलतांना संयम सुचवतो आहे.व्यवसायात चालढकल करणे टाळल्यास उत्तम लाभ होतील. नोकरदार वर्गाने कामातुन अनेक लाभ होतील.
**महिला -** आर्थिकस्तर उत्तम राहु शकेल.तरिसुध्दा उधारीचे व्यवहार टाळावे लागतील.समाजमाध्यमांचा वापर उपयुक्त ठरु शकेल.घरातले वातावरण चांगले ठेवु शकाल.
**विद्यार्थी -** प्रकृती उत्तम राहील.
**शुभदिनांक-१८-१९-२०.**

**मकर - वेळेनुसार शांततेने निर्णय घ्या.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना बर्यापैकी यश मिळवु शकाल हा सर्व दिवसांचा कालावधी चढउतारांचा राहणार आहे.या कालावधीत सहनशीलता वाढवावी लागेल.जशी परिस्थिती आहे तशी स्वीकारण्याचा प्रयत्न करणे पोषक राहील. कारण नसताना उगाचच कोणत्याही गोष्टीचा वाद वाढवू नका.अंदाजे कृती करणे टाळावी लागेल.इतरांना सल्ला न दिलेलाच चांगला.कौटुंबिकस्तरावर वावरतांना समाधान मिळेल. शुक्रबदल चांगलाच पोषक ठरु शकेल.व्यव सायातील जबाबदारी दुसऱ्यांवर अजिबात टाकू नका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालेल.उपासना करा.
**महिला -** आर्थिक नियोजन अधिक पक्के करावे लागेल. राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा करताना मागील अनुभव विसरू नका. घरातज्येष्ठ व्यक्तींचा आदर करा.
**विद्यार्थी -** योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-२०-२१-२२.**

**कुंभ - बोलतांना संयम बाळगावा.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना सावधानता बाळगावी लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना सप्ताहातील सर्वच दिवस बरे आहेत.समंसपना दाखवल्यास कोणत्याही दिवसांत विशेष काळ जी करण्याची गरज नाही.त्यामुळे मनामध्ये वारंवार जो नकारात्मक विचार येत होता तोही आता कदाचित येणार नाही.काम करायला ही उत्साह वाटु लागेल.अडचणीचा कालावधी हळुहळु कमी होऊ शकेल.तणावाचे वातावर णच नाही असे नाही.जपुन रहा. शुक्रबदल बरा राहील.व्यवसाय करतांना फायद्याचे प्रमाण साधारण राहु शकेल. नोकरदार वर्गाला कदाचित नोकरीचे प्रस्ताव येतील.
**महिला -** वरिष्ठांचे सहकार्य गोडबोलुन मिळवावे लागेल.कदाचित आर्थिक लाभ होऊ शकतील.मनमानी-राग-आळस हे सर्व वेळिच टाळलेले बरे राहु शकेल.उपासना करा.
**विद्यार्थी -** आरोग्य जरा नरम राहील.
**शुभदिनांक-२१-२२-२३.**

**मीन - यश मिळवु शकाल.**
ग्रहप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना घाईगडबड करु नये.सर्व दिवस साधारण चांगले असु शकतील.प्रत्येक वेळी होणारा संघर्ष सध्या तितकासा जाणवणार नाही. सकारात्मक गोष्टी घडु शकतील.उगाचच घाईगडबड करून कोणतेही काम करण्याची सध्या तरी गरज नाही.सध्या तुम्ही जे ठरवणार आहात त्याप्रमाणे बहुतांशी काम होत राहील.तेव्हा इतरांचे मार्गदर्शनही चांगले मिळेल.जी धरसोड वृत्ती होती तीसुद्धा कमी होईल.शुक्रबदल चांगला राहु शकेल.व्यवसायातील परिस्थिती नेहमीप्रमाने बरी राहु शकेल. नोकरदार वर्गाला पर्यायी गोष्ट स्वीकारणे योग्य राहु शकेल.
**महिला -** आर्थिक लाभ बर्यापैकी होऊ शकेल.सार्वजनिक क्षेत्रात सामूहिक गोष्टींची आवड राहील.नातेवाईकांशी कार्यक्रमानिमित्त भेटीगाठी होऊ शकतील.
**विद्यार्थी -** प्रकृती बरी राहील.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

# नुसताच गडगडाट... पाऊस पडलाच नाही!

**निळू दामले**

गडगडाट झाला. विजा चमकल्या. पाऊस पडला नाही. युक्रेन-रशिया युद्ध थांबलं नाही. डोनल्ड ट्रंप व्लादिमिर पुतीन यानी ढोल बडवून गवगवा करून चर्चा केली. युद्ध सुरूच राहिलं.

अलास्का या अमेरिकेतल्या राज्यात बैठक झाली. हे राज्य १८७८ साली रशियन राणीनं अमेरिकेला विकलं होतं.रशिया एका युद्धात पार बुडाला होता, रशियाकडं पैसे नव्हते. अलास्का विकून रशिया तगला होता.

आठवडाभर ट्रंप संदेश देत होते. निघतांना व्हाईट हाऊसच्या विमानतळावर त्यांनी संदेश दिला. विमानात बसून संदेश दिला. विमान अलास्कात उतरल्यावर ट्रंप विमानाबाहेर आले आणि सदेश दिला. 'मी युक्रेन-रशिया युद्ध थांबवणार आहे.'

**पुतीन काहीच बोलत नव्हते.**

पुतीनचं विमान आलं. पुतीनसमोर लाल पायघडी पसरली होती.

बुचा हे अख्खं युक्रेनियन गाव रशियन फौजानी ठार मारलं तेव्हांपासून पुतीनना 'बुचाचा खाटिक' असं म्हटलं जातं. खाटिकाचं स्वागत.

पुतीन विमानातून उतरले त्याच वेळी पूर्व युरोपमधे बॉंब कोसळत होते, राजधानी कीवमधे सायरन वाजत होते. पुतीन-ट्रंप चर्चा सुरु झाली तेव्हां कीववर बॉंब पडले.

पुतीन ट्रंप यांच्या बीस्ट (जनावर) या सहादारी चिलखती गाडीकडं निघाले तेव्हां पत्रकाराना पायघडीपासून दूरवर रोखण्यात आलं होतं. तरीही एक पत्रकार जोरात ओरडला- प्रेसिडेंट पुतीन तुम्ही नागरिकाना ठार मारणं थांबवणार आहात कां?'

आसपासच्या सर्वांना हा प्रश्न ऐकू गेला. पुतीननी हात हलवत आपल्याला ऐकू आलं नाही असा आविर्भाव केला. ट्रंपनी पुतीनना ओढलं 'त्यांचं काही ऐकू नका' असा आविर्भाव करून पुतीननं हलकेच पुढं ओढलं.

एक दालन सजवण्यात आलं होतं. अलास्का २०२५ असं या घटनेचं शीर्षक ठरलं होतं.ट्रंप, पुतीन एकमेकाच्या मांडीवर हात ठेवता येईल इतक्या अंतरावर खुर्च्यांवर बसले. तिथपर्यंत फोटोग्राफर आणि पत्रकार होते. नंतर दोघंच उरले.

**तीन तास चर्चा झाली.**

नंतर पत्रकार परिषद झाली. यजमानानं आधी निवेदन करायचं आणि नंतर पाहुण्यानं असा संकेत आहे. अलास्कात आधी भाषण केलं पुतीन यांनी.

चर्चेत काय झालं ते पुतीननी सांगितलं नाही. ट्रंप कसे थोर आहेत याचंच वर्णन पुतीननी केलं. पुतीन यांचं एक वाक्य असं होतं 'ट्रंप म्हणाले होते ते खरं आहे. २०२२ साली ट्रंप अध्यक्ष असते तर हे युद्ध झालंच नसतं.' बायडन यांना युद्ध रोखता आलं नाही असं पुतीन यांना म्हणायचं होतं.

**ट्रंपनी तरी युद्ध कुठं रोखलंय?**

पत्रकारांसमोर पुतीन युद्ध थांबवण्या बद्दल काहीच बोलले नाहीत.

हिज एक्सलन्सी प्रेसिडेंट पुतीन यांच्या सन्मानार्थ सेरेमोनियल भोजन ठरलं होतं. ते रद्द झालं. जेवण न करताच दोन्ही प्रेसिडेंट आपापल्या घरी परतले.

पत्रकारांसमोर ट्रंप यांनी पुतीन यांचं गुणगान केलं. पुतीन आपले कसे ग्रेट, फँटास्टिक मित्र आहेत ते सांगितलं. चर्चेत ग्रेट प्रगती झाली पण निष्कर्ष निघाला नाही असं ट्रंप म्हणाले.

**ट्रम्प-पुतिन चर्चा निष्फळ**



पुतीनचं आगमन, चर्चा, पत्रकार परिषद, निर्गमन या साऱ्या गोष्टी अत्यंत वेगानं पार पडल्या. गुंडाळल्या हेच योग्य वर्णन ठरेल.

ट्रंप विमानात बसले. बसल्या बसल्या त्यानी झेलेन्सकीना फोन लावला. झेलेन्सकीना वॉशिंग्टनला बोलावलं.

विमानातून उतरल्या उतरल्या ट्रंपनी फॉक्स न्यूजचे शॉन हेनेटी याना अर्ध्या तासाची मुलाखत दिली. व्हाईट हाऊसमधून अधिकृत मुलाखत ट्रंप देत नसतात, त्यांचा सगळा मामला खाजगी असतो.

मुलाखत मुलाखत नव्हतीच. ट्रंप त्यांच्या चाहत्या पत्रकारांना (मराठी भाषेत म्हणायचं तर चमच्याना) मुलाखती देत असतात. ट्रंपना आवडतील असे, ट्रंपनी लिहून दिल्यागत असलेले प्रश्न हेनेटीनी विचारले.

आपण जगातली सात युद्धं थांबवली असं ट्रंप म्हणाले. त्यात कंबोडिया वगैरेचे उल्लेख होते. कंबोडियातलं युद्ध त्या आधी कोणाच्याही लक्षात आलं नव्हतं.

गाझा युद्ध थांबवण्याच्या प्रयत्नांचा खूप गाजावाजा झाला. नेतान्याहू गाझाला कुटत आहेत, अजूनही. आफ्रिकेतल्या कांगोमधे युद्ध चाललंय. शेजारचे रवांडा, युगांडा इत्यादी देश त्यात गुंतलेले आहेत. ट्रंपनी रवांडा-कांगोच्या नेत्याना व्हाईट हाऊसमधे बसवलं, फोटो काढून घेतले, युद्ध थांबवल्याचं जाहीर केलं. कांगोमधलं युद्ध थांबलेलं नाही.

युक्रेनचं तर विचारायलाच नको. प्रेसिडेंट झाल्या झाल्या ट्रंप म्हणाले की मी चोविस तासात युद्ध थांबवून दाखवतो, झेलेन्सकी आणि पुतीन दोघांशीही माझे घट्ट संबंध आहेत, ते माझं ऐकल्या शिवाय रहाणार नाहीत. नंतर ट्रंप आज झेलेन्सकीना, उद्या युरोपीय पुढाऱ्याना, परवा पुतीननं धमक्या देत राहिले. युद्ध थांबवलं नाहीत तर तुमच्यावर प्रलय कोसळणार आहे असं म्हणत राहिले. प्रत्येकाला मुदत दिली. दोन महिन्यांची मुदत देतो, महिन्याची मुदत देतो, आता शेवटली आठ दिवसांची मुदत देतो; एक मुदत संपली की दुसरी मुदत देत राहिले.

अलास्कात भेटण्याआधी आपल्या दूताकरवी त्यानी युद्धबंदीचा प्रस्ताव पाठवला होता. युक्रेननं रशियाच्या टाचेखालची जमीन रशियाला द्यावी आणि रशियानं दक्षिण युक्रेनमधली लाटलेली जमीन युक्रेनला परत करावी. ना रशियाला हे मान्य झालं, ना युक्रेनला, ना युरोपीयन देशाना. तिघंही ट्रंप यांचा प्रस्ताव झिडकारत होते.

युक्रेन युद्धाला बायडन जबाबदार आहेत असं ट्रंप मुलाखतीत म्हणाले. आता युद्ध थांबवणं झेलेन्सकींच्या हाती आहे असं म्हणून जबाबदारी झेलेन्सकींच्या खांद्यावर ट्रंपनी टाकली.

युक्रेन रशिया युद्धाबद्दल ट्रंप एकट्यानं ठरवतात, एकट्यानं बोलतात. अख्ख्या जगातल्या कोणालाही विचारत नाहीत.

सम्राट ट्रंप आणि सम्राट पुतीन असे दोन राजे करोडो लोकांच्या वतीनं निर्णय घेत आहेत.. प्रजाजनांनी फक्त ऐकायचं, टाळ्या वाजवायच्या, आपसात हळूच म्हणायचं, छान करमणुक झाली बुवा, लाखो लोकांच्या मृत्यूची किमत देऊन.

बाय द वे गेल्या आठवड्यात ट्रंपनी नॉर्वेच्या अर्थमंत्र्याना फोन लावला. मंत्री चकीतच झाले. ते रस्त्यावर चालत असताना फोन वाजला. कशासाठी फोन, ट्रंपनी काय काढलं, सेक्रेटरी वगैरे नव्हे तर खुद्द ट्रंपच बोलत आहेत. मंत्री चक्रावले. ट्रंप म्हणाले की त्यांना नोबेल पारितोषिक मिळालं पाहिजे, काय करता येईल?

त्या फोन नंतर फेल गेलेली अलास्का चर्चा. ट्रंपचं नोबेल हुकलेलं दिसतंय.

***(लेखक ज्येष्ठ पत्रकार - राजकिय विश्लेषक आहेत.)***

## पत्र मानस

### भारतात ऑनलाइन शॉपिंगचा वाटा फक्त 8 टक्के!

सध्याच्या डिजिटल युगात, ऑनलाइन शॉपिंग करण्यासाठी वेळेचे नसलेले बंधन, निरनिराळ्या सवलती, वस्तूंचे भरपूर पर्याय, वस्तूंची जलद डिलिव्हरी तसेच वस्तू पसंत न पडल्यास परत करण्याचा पर्याय अशा अनेक गोष्टींमुळे ऑनलाइन शॉपिंगकडे लोकांचा कल वेगाने वाढत आहे. २०२४ मध्ये ऑनलाइन खरेदीदारांची जागतिक संख्या २.७१ अब्ज इतकी होती, ती २०२५ मध्ये २.७७ अब्जांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सिंगापूरस्थित डेटारिपोर्टलच्या आकडेवारीनुसार, ऑनलाइन खरेदीच्या बाबतीत अमेरिका आघाडीवर आहे. या देशात ऑनलाइन खरेदीचा वाटा ३३.७ टक्के आहे. तर चीन दुसऱ्या क्रमांकावर असून चीनचा ऑनलाइन खरेदीचा वाटा ३१.२ टक्के आहे. त्यानंतर युकेचा (२३.२ टक्के) तिसरा क्रमांक, दक्षिण कोरियाचा (२२ टक्के) चौथा क्रमांक आणि नेदरलँड्सचा (२०.९ टक्के) पाचवा क्रमांक लागतो. त्यानंतर या यादीमध्ये अनुक्रमे कॅनडा (१७.९टक्के), जपान (१६.२टक्के), इटली (१४.९टक्के), जर्मनी (१४.६टक्के) आणि नॉर्वे (१४.५ टक्के) हे देश आहेत. भारतात ऑनलाइन शॉपिंगचा वाटा फक्त ८ टक्क्यांच्या दरम्यान असल्याने या यादीत भारत पहिल्या २५ देशांमध्येही नाही. मात्र २०३० पर्यंत भारताची ऑनलाइन शॉपिंग करणाऱ्यांची संख्या ते १५ ते १७ टक्क्यांपर्यंत म्हणजे जागतिक सरासरीच्या १७.३ टक्क्यांच्या जवळपास पोहोचेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## स्वातंत्र्य दिनानिमित्त महावितरणाचे विविध कार्यक्रम

**ठाणे :** केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर योजना व पीएम कुसुम योजनेबाबत माहिती देण्यासाठी ठाणे जिल्ह्यात १५ ऑगस्ट २०२५ रोजी महावितरणतर्फे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. जिल्ह्यातील ठाणे शहर व नवी मुंबईतील विविध भागात मेळावे, मॅराथॉन रॅली चे आयोजन करण्यात आले . तसेच, कार्यालयातील परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात पी एम सूर्यघर व इतर योजनांबाबत माहिती देण्यात आली. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय ते गडकरी रंगायतन तळापाली ते वृंदावन पर्यंत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत बिजली योजनाबाबत माहिती देणारे दर्शनीय रथ यात्रा काढण्यात आली. तर, पावर हाऊस उपविभागीय कार्यालय ते ठाणे मार्केट पर्यंत पदयात्रा काढण्यात आली. तसेच, ठाणे मार्केट ते दादोजी कोंडदेव स्टेडियम पर्यंत मॅरेथॉन रॅली काढण्यात आली. या रॅली व पदयात्रे मध्ये बॅनर पोस्टरच्या माध्यमातून योजनांबाबत जनजागृती करण्यात आली. याशिवाय, नवी मुंबईतील ऐरोली बोनकोडे, महापे, वाशी नगर, पाम बीच, नेरूळ, शिरवणे व बेलापूर येथील गृहनिर्माण संस्थेत प्रधानमंत्री सूर्य घर मोफत बिजली योजने बाबत माहिती देण्यासाठी मेळावा घेण्यात आला.



## महत्त्वाचे

### बारवी धरणातून पाण्याचा विसर्ग

**बदलापूर :** ठाणे जिल्ह्याची तहान भागवणारे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बारवी धरण शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास ओसंडून वाहू लागले. गेल्या अनेक दिवसांपासून बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची प्रतीक्षा होती. आता बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने ठाणे जिल्ह्याची पाणी चिंता मिटली आहे. बारवी धरणातून ठाणे जिल्ह्यातील नागरी आणि औद्योगिक तहान भागवली जाते. नगरपालिका, ग्रामपंचायती आणि औद्योगिक क्षेत्राला बारवी धरणातून पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे बारवी धरण पूर्ण क्षमतेने भरण्याकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि शासकीय संस्थांचे डोळे लागलेले असतात. यंदाच्या वर्षात बारवी धरणात खूप लवकर पाणी साठवण्यास सुरुवात झाली. यंदा पश्चिम विक्षोभ असल्याने मे महिन्यात पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला पावसाने जोरदार हजेरी लावली. मे महिन्याच्या अखेरीस अवकाळी पावसाने जोरदार दणका दिला. त्यानंतर मोसमी पाऊस मे महिन्याच्या शेवटी सुरू झाला . त्यामुळे महिन्यात बारवी धरणातील पाण्याचे बाष्पीभवन झाले नाही.

### एमआयडीसीत कोयता टोळीचा तडिपार गुंड अटकेत

**डोंबिवली :** विविध गुन्हे दाखल असलेला आणि पोलीस उपायुक्तांनी ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातून तडिपार केलेला एका कोयता टोळींचा गुंड मानपाडा पोलिसांनी एमआयडीसी फेज एक भागातून अटक केला. शीळ रस्त्यावरील टाटा पॉवर नाका देशमुख होम्स परिसरात राहणारा हा गुंड पोलिसांची नजर चुकवून पुन्हा डोंबिवलीत दाखल झाला होता. तो हातात कोयता घेऊन दहशत पसरवित होता. लखन राजू पवार असे या गुंडाचे नाव आहे. तो कल्याण शीळ रस्त्यावरील टाटा पॉवर नाका येथील देशमुख होम्सच्या बाजुला असलेल्या गांधीनगर पिसवली भागातील रहिवासी आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्याने आणि त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल असल्याने पोलीस उपायुक्तांनी मागील वर्षी त्याला ठाणे, मुंबई, रायगड जिल्ह्यातून हद्दपार केला आहे. लखनची पिसवली, टाटा पॉवर नाका भागात खूप दहशत होती. त्याच्या त्रासाला नागरिक, व्यावसायिक, व्यापारी कंटाळले होते. रात्रीच्या वेळेत एकट्या असलेल्या पादचाऱ्याला तो आपल्या साथीदारांच्या साहाय्याने धमकावत होता.

### कल्याणमधील ज्येष्ठ विधिज्ञ दत्तात्रय सबनिस यांचे निधन

**कल्याण :** कल्याण मधील ज्येष्ठ विधिज्ञ आणि दिवाणी कायद्याचे तज्ज्ञ दत्तात्रय निळकंठ उर्फ अप्पा सबनिस यांचे शनिवारी दत्त आळीतील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. ते ९७ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे उज्जवल आणि रमेश सबनिस, मुलगी तिलोत्तमा, स्नुषा अर्चना, नातवंडे, जावई, पतवंडे असा परिवार आहे. कल्याण मधील सबनिस कुटुंब हे पीढीजाद खानदानी वकिली व्यवसाय करणाऱ्या परंपरेतील कुटुंब आहे. त्यांच्या घरातील चौथी पीढी आता वकिली व्यवसायात आहे. कल्याण मधील ज्येष्ठ वकील दिवंगत श्रीधर निळकंठ उर्फ भाऊसाहेब सबनिस यांचे अप्पा सबनिस हे धाकटे बंधू होते. अप्पा सबनिस यांनी साठ वर्ष अतिशय निष्ठा, सचोटी आणि प्रामाणिकपणाने वकिली व्यवसाय केला. शांत आणि संयमी स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

# लॉटरीचं आत्मपरीक्षण नाईकांनीच करावं

## खासदार नरेश म्हस्केंचा गणेश नाईकांना सणसणीत टोला

प्रतिनिधी
■ ठाणे

लॉटरी कोणाला लागली? याचे आत्मपरीक्षण गणेश नाईक यांनी करावे. साठी बुद्धी नाठी असं म्हणतात, त्यांचे वय झाले आहे, त्यामुळे ते काय बोलतात हे त्यांनाच माहीत असा पलटवार खासदार नरेश म्हस्के यांनी गणेश नाईक यांच्यावर केला आहे . जर एकनाथ शिंदे यांनी उठाव केला नसता तर आता सत्ता आली नसती, त्यामुळे लॉटरी कोणाला लागली ते त्यांनी ठरवावे याचीही आठवण त्यांनी नाईक यांना करून दिली.



पालघर येथे स्वतंत्र दिनाच्या निमित्ताने आयोजित एका कार्यक्रमात वनमंत्री गणेश नाईक यांनी एकनाथ शिंदे यांना लॉटरी म्हणून ते मुख्यमंत्री झाले असल्याचे सांगितले. परंतु त्यांना ते टिकविता आले नाही नसल्याची टीका केली होती. यानंतर पुन्हा शिंदे सेना आणि भाजपचे गणेश नाईक यांच्यातील कटुता पुन्हा एकदा समोर आली आहे.

शिंदे सेनेकडून सध्या नवी मुंबईत नाईक यांच्या विरोधात कुरघोडी वाढली आहे. त्यामुळे नाईक सध्या त्रस्त आहेत. त्यामुळे संधी मिळेल तेव्हा ते शिंदे सेनेचा खरपूस समाचार घेत आहेत. अशातच त्यांनी पालघर मध्ये शिंदे यांच्यावर टीका करीत तोंड सुख घेतले. त्यानंतर ठाण्यात शनिवारी खासदार म्हस्के यांनी पलटवार केला आहे. एकनाथ शिंदे हे सतत जिंकत आलेले आहेत, मात्र नाईक यांचा पराभव झाला आहे. आता ते पुन्हा निवडून आले आहेत. मात्र शिंदे यांनी उठाव केला नसता तर आज सत्ता सुद्धा आली नसती याची आठवण त्यांनी नाईक यांना करून दिली.

# कासारवडवली येथे कारने घेतला पेट

■ ठाणे

घोडबंदर येथील कासारवडवली भागात शनिवारी दुपारी एका कारने अचानक पेट घेतला. कार पेट घेत असल्याचे लक्षात आल्यानंतर चालकासह तिघेजण कारमधुन बाहेर पडले त्यामुळे ते बचावले. कार पूर्णपणे जळाली असून या घटनेत कोणीही जखमी झाले नसल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.घोडबंदरहून ठाणेच्या दिशेने कार चालक वाहतुक करत होता. कारमधुन चालकासह तीन जण प्रवास करत होते. शनिवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास तो कासारवडवली सिग्नल जवळ आला असता, त्याच्या कारने अचानक पेट घेण्यास सुरूवात केली. कार पेट घेत असल्याचे लक्षात आल्यानंतर चालक आणि इतर दोघे कारमधुन बाहेर पडले. त्यानंतर अवघ्या काही क्षणात कारने पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच, बाळकुम अग्निशमन दलाचे अधिकारी, अग्निशमन दलाचे जवान, ठाणे शहर वाहतूक विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

# दहीहंडी कार्यक्रमांमुळे ठाण्यात कोंडी, नागरिकांचे हाल



प्रतिनिधी
■ ठाणे

दहीहंडी निमित्ताने ठाण्यात ठिकठिकाणी वाहतुक बदल लागू केले. त्याचा परिणाम शहरातील वाहतुक व्यवस्थेवर झाला. ठाण्यातील कॅडबरी जंक्शन, माजिवडा, मुंबई नाशिक महामार्गावर वाहतुक कोंडी झाली होती.

ठाणे शहरात दहीहंडीचे आयोजन केल्याने मुख्य तसेच अंतर्गत मार्गावर अनेक ठिकाणी ठाणे वाहतुक पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले. गोविंदा पथकांची वाहने, रस्त्यावर वाहनांचा भार वाढल्याने शनिवारी पूर्व द्रुतगती महामार्गावर कॅडबरी जंक्शन ते साकेत पूल आणि कापूरबावडी पर्यंत वाहतुक कोंडी झाली होती. या वाहतुक कोंडीमुळे घोडबंदर येथून ठाण्याच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या चालकांचे हाल झाले. वसंत विहार, मानपाडा भागातही अनेक ठिकाणी कोंडी झाली होती.

# नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात जोरदार पाऊस

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

भारतीय हवामान खात्याकडून ठाणे जिल्ह्याकरिता आज देण्यात आलेला रेड अलर्ट व २० ऑगस्टपर्यंत दिलेल्या ऑरेंज अलर्टच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संपूर्ण महापालिका यंत्रणेस दक्ष राहण्याचे निर्देश दिले असून सर्व विभागांचे संपर्क अधिकारी तसेच विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी व विभागातील आपत्कालीन कक्षातील कर्मचारी तसेच स्वच्छता निरीक्षक आपापल्या कार्यक्षेत्रात मदत कार्यासाठी कार्यरत आहेत.

काल मध्यरात्रीपासून पावसाचा जोर वाढला असला तरी नागरिकांनी घाबरून न जाता कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी 022-27567060 किंवा 022-27567061 या क्रमांकावर अथवा 1800222309 / 1800222310 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन नवी मुंबई महापालिकेने केले आहे. शनिवार सकाळपासूनही शहरात जोरदार पाऊस सुरू असून पावसाचे सातत्य कायम आहे. दुसरीकडे आज पावसात दहीहंडी उत्सवही सुरू असून नवी मुंबई शहरातील शाळांना सुट्टी नव्हती. परंतु एकीकडे दहीहंडीचा उत्सव आणि जोरदार पाऊस यामुळे शाळांमध्ये खूप कमी प्रमाणात विद्यार्थी उपस्थित असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# दहीहंडी 2025 : ठाणे शहरात आतापर्यंत पाच ते सहा गोविंदा जखमी

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे शहरात सकाळ पासून ठाण्यासह मुंबईतील गोविंदा पथक दाखल झाले आहेत. विविध दहीहंडी आयोजकांकडे या पथकांनी थर रचले. त्यातील काहीजणाचे थर अचूक लागले तर, काहींचे कोसळले. पण,या चुरशीमध्ये पाच ते सहा गोविंदा जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. यातील तीन गोविंदांवर कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

ठाणे शहरात टेंभी नाका, तलावपाळी, रघुनाथ नगर, वर्तकनगर, हिरानंदानी मेडॉस, नौपाडा आणि रेमंड याठिकाणी मोठ्या दहीहंडींचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडींना लाखो रुपयांचे पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. या दहीहंडीमध्ये थर रचण्यासाठी सकाळपासून ठाण्यासह मुंबई आणि उपनगरातील गोविंदा पथक दाखल झाले आहेत.



सकाळ पासून हे गोविंदा उंच उंच थर रचण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतू, काही ठिकाणी गोविंदा थर रचताना कोसळून जखमी झाले आहेत. सायंकाळी ४ वाजेपर्यंत मिळालेल्या माहितीनुसार,कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात सद्यस्थितीला तीन गोविंदा उपचारासाठी दाखल झाले आहेत.

कळवा येथे राहणारा आदित्य रघुनाथ वर्मा ( १८) याच्या डोक्याला, मुंब्रा पारसिक नगर येथे राहणारा कृष्णा मिठू स्वयन (१३) याच्या उजव्या हाताला आणि कळवा अतकोनेश्वर नगर येथे राहणारा समर बन्सीलाल राजभर (१०) यांच्या डोक्याला दुखापत झाली असल्याची ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. तर, श्रीराज पवार (१०) हा गोविंदा गोपाळकालाच्या पूर्वसंध्येला थरावरुन खाली कोसळला होता. त्याच्यावर ठाणे जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



*सानपाडा येथील ज्येष्ठ नागरिक संघ व गार्डन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यदिनी रेल्वेमधून सेवानिवृत्त झालेले रेल्वे पोलीस इन्स्पेक्टर कांताराम धंद्रे व हवाई दलामधून सेवानिवृत्त झालेले कदम, माजी सैनिक . पवार यांच्या शुभहस्ते झेंडावंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती कदम, उपाध्यक्ष बळवंतराव पाटील, प्रभारी सचिव शरद पाटील, खजिनदार विष्णुदास मुखेकर, उपाध्यक्ष डॉ. विजया गोसावी, समाजसेवक पांडुरंग आमले, कामगार अंकाचे कार्यकारी संपादक मारुती विश्वासराव, महाराष्ट्र शासनाचे माहिती विभागातील सेवानिवृत्त महासंचालक देवेंद्र भुजबळ, सानपाडा हास्य क्लब योगाचे शिक्षक भरत खरात आदी मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.*

# पुनर्वापरित प्लास्टिकच्या झाकणांपासून पर्यावरणपूरक तिरंगा फलक

■ नवी मुंबई

नागरिकांनी दैनंदिन वापरातून निसर्गाला हानीकारक असणाऱ्या प्लास्टिकला हद्दपार करावे व प्लास्टिकमुक्त नवी मुंबई ही संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी स्वयंस्फुर्तीने योगदान द्यावे याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेने ‘प्रोजेक्ट मुंबई’ या स्वयंसेवी संस्थेशी सामंजस्य करार (MOU) केलेला असून 'नवी मुंबई प्लास्टिक आणि ई-वेस्ट रिसायक्लोथॉन' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या व्यापक स्वरूपातील उपक्रमामध्ये पुनर्वापर केलेल्या प्लास्टिकमधून विविध उपयोगी वस्तू बनविण्यात येऊन थ्री-आर सूत्रांनुसार प्लास्टिकचा पुनर्वापर केला जात आहे.



अशाच प्रकारे ‘घरोघरी तिरंगा – घरोघरी स्वच्छता’ अभियानांतर्गत प्लास्टिक बाटल्यांच्या झाकणांवर पुनर्प्रक्रिया करून त्या पुनर्वापरित झाकणांपासून तयार केलेल्या तिरंगा फलकाचे स्वातंत्र्यदिनानिमित्त अनावरण महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.भागवत डोईफोडे, शहर अभियंता श्री.शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सत्यवान उबाळे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व श्रीम. स्मिता काळे, अति.शहर अभियंता श्री. अरविंद शिंदे आणि इतर विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. 2460 पुनर्वापरित प्लास्टिकच्या झाकणांपासून तयार केलेली ही तिरंगा फलक प्रतिकृती महापालिका मुख्यालयाच्या आवारातच प्रदर्शित करण्यात येणार असून याव्दारे प्लास्टिकमुक्तीचा संदेश महापालिका मुख्यालयात विविध कारणांसाठी भेट देणा-या नागरिकांच्या नजरेसमोर कायम ठेवला जाणार आहे.

# जी.के.एस. महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी
■ कल्याण

मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचालित जी.के.एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खडवलीच्या संचालिका सौ. कविता शिकतोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी महाविद्यालयात ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एल.जाधव सर यांच्या हस्ते आपल्या सार्वभौमत्वाचे व स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणजे राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात आला.

याप्रसंगी उपप्राचार्य प्रशांत तांदळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य विकास सावंत, उपप्राचार्य शफीक शेख व सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने



उपस्थित होते. ध्वजारोहणासाठी इयत्ता बारावीचा विद्यार्थी कु. प्रथमेश शेळके यांनी परेड दिली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीत व ध्वजगीत गाण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी कु.जानवी, वृषाली,आदिती, मानसी यानी "जय जय महाराष्ट्र माझा" गीत गाण्यात आले. त्यानंतर मोठ्या आनंदाने लेझीम सादर करण्यात आले. लेझीम साठी कु.श्वेता, अफ्रीन, सुचिता, रसिका या विद्यार्थिनी सहभागी घेतला.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी .एल .जाधव सर यांनी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने प्रेरणादायी विचार मांडून देशातील तरुण पिढीला मोलाचा संदेश दिला.

# कल्याणमध्ये शाळकरी बालकाने आईचे 23 तोळे सोन्याचे दागिने चोरले

प्रतिनिधी
■ कल्याण

तुझ्या मैत्रिणीने तुझ्या विरुध्द बाजारपेठ पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे. हे प्रकरण न्यायालयात गेले आहे. असे कल्याण पश्चिमेतील एका सोळा वर्षाच्या बालकाला एका जीम प्रशिक्षकाने सांगितले. त्या बालकाला घाबरून सोडून त्याच्याकडून हे सर्व प्रकरण मिटवण्यासाठी टप्प्याने एकूण २३ तोळे सोने उकळले. बालकाने हे सर्व सोन्याचे दागिने आपल्या आईने घरात ठेवलेल्या कपाटातून चोरले आणि जीम प्रशिक्षकाला दिले आहे. अलीकडे हा सर्व प्रकार उघडकीला आला आहे. याप्रकरणी मुलाच्या वडिलांनी जीम प्रशिक्षका विरुध्द बाजारपेठ पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. बालकाचे वडील व्यावसायिक आहेत. आई शिक्षिका आहे.

पोलीस ठाण्यातील माहिती अशी, की सोळा वर्षाचे बालक कल्याण मधील आपल्या घर परिसरातील व्यायामशाळेत व्यायामासाठी जात होते. तेथे त्याची ओळखी एक जीम प्रशिक्षकाशी झाली. प्रशिक्षकाने बालकाची ओळख त्याच्या मैत्रिणीशी करून दिली. मैत्रिण आणि बालक यांचे नियमित मोबाईल, इन्स्टाग्रामच्या माध्यमातून बोलणे होत होते. जीम प्रशिक्षकाने एकदा बालकाला संपर्क करून आपल्या मैत्रिणीशी तु बोलणे बंद कर. ती मैत्री करण्याच्या पात्रतेची नाही.

# पारधी समाजाने डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणाचा वसा घेऊन उन्नती करावी - पत्रकार राजू झनके

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महापे एम आय डी सी येथील भूतवली पारधी वाडी येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वर्षानुवर्षे वंचित, उपेक्षित जीवन जगत असलेल्या आणि ब्रिटिश राजवटीत गुन्हेगार जमातीचा मारलेला पाठीवरचा शिक्का घेऊन वाटचाल करणाऱ्या या पारधी वसाहतीत लोकांमध्ये दांडगा उत्साह दिसून आला. या कार्यक्रमाला मुंबईतील ज्येष्ठ पत्रकार व शासनाने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविलेले राजू झनके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी आदिवासी पारधी समाजाचे तरुण अध्यक्ष संतोष पवार हे होते.

राजू झनके यांनी मार्गदर्शनपर भाषणात, गुन्हेगारी जमात म्हणून इंग्रजांनी पारधी समाजावर आपल्या सोयीनुसार मारलेला शिक्का घालवायचा असेल तर संविधान निर्माते डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांचा शिक्षणाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आदीवासी पारधी समाजाने आपली उन्नती करावी असे आवाहन केले. ते पुढे म्हणाले, गावकुसाबाहेर राहून गुन्हेगारी जमात हा शिक्का उरावर घेऊन जगणाऱ्या या आदीवासी पारधी समाजाने निराशावादी मानसिकतेतून बाहेर यैण्याची खरी गरज आहे.

### एक वही, एक पेन अभियानांतर्गत शैक्षणिक साहित्याचे वितरण

या वेळी एक वही,एक पेन अभियानांतर्गत पारधी वस्तीतील मुलांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन देखील यावेळी करण्यात आले होते.

# पनवेल महानगरपालिकेच्या ‘अभय योजने’तर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## 16 ऑगस्ट ते 15 सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती 90टक्के सुट

प्रतिनिधी
■ पनवेल

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी ‘अभय योजना’ राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत आता वाढविण्यात आली आहे. आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९०टक्के सुट राहणार आहे.

तसेच १६ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत कर भरल्यास ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे .तसेच २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत संपूर्ण कर भरल्यास ५ टक्के सवलतही दिली जाणार आहे. महापालिकेच्यावतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील २टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.

### *कर-मित्र’ चॅटबॉटचे लोकार्पण*

*नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने ‘कर-मित्र’ चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.*

*कर-मित्र चॅटबॉट द्वारे नागरिकांना खालील सेवा उपलब्ध होतील:*

- *मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे.*
- *आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे.*
- *बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन.*
- *योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती.*

*अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील ‘कर-मित्र’ चॅटबॉट चा वापर करावा.*

पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

नागरिकांचा अभय योजनेला मोठा प्रतिसाद मिळत आहे. म्हणूनच नागरिकांनी केलेल्या मागणीनुसार आता १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९०टक्के सुट राहणार आहे. अभय योजनेमध्ये १८ऑगस्ट ते १५ऑगस्ट आतापर्यंत एकूण २१२कोटी ५७ लाखाची विक्रमी वसुली झाली आहे.

# कुर्डुस गावातील विहिरीवरच्या दहीहंडीचा थरार आजही कायम

प्रतिनिधी
■ अलिबाग

मुंबई ठाण्यातीसल दहिहंडी उत्सवाचे लोण आता कोकणातही ठिकठिकाणी पहायला मिळू लागले आहे. या उत्सवाला राजकीय आश्रय प्राप्त झाल्याने रायगड जिल्ह्यातही ठिकठीकाणी लाखमोलाच्या दहिहंडी उत्सवांचे आयोजन केले जाऊ लागले आहे. मात्र अलिबाग तालुक्यातील कुर्डूस येथे दरवर्षी एका आगळ्या वेगळ्या दहिहंडी उत्सवाचे आयोजन केले जात आहे. हा दहिहंडी उत्सव त्यातील थरारामुळे लक्षवेधी ठरु लागला आहे.

गावातील विहीरीवर दहीहंडी बांधून ती उडी मारून फोडण्याची परंपरा गावाने जोपासली आहे. १९९२ साली गावातील केणी, शेरामकर, पिंगळे या कुडूंबांनी या आगळया वेगळ्या दहिहंडी उत्सवाची सुरवात केली. हळुहळु संपुर्ण पंचक्रोशीत हा आगळा वेगळा दहिहंडी उत्सव आकर्षणाचा केंद्र बिंदु ठरू लागला.



गावातील मोठ्या भल्या मोठ्या विहिरीवर या दहिहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. गावातील लोक विहीरीवर गोलाकार बसून, गोविंदाला हाताच्या पंजावर उचलून, दहिहंडीच्या दिशेने उडवतात, त्यानंतर तो गोविंदा हवेत असतांनाच दहिहंडीला स्पर्श करण्याचा प्रयत्न करतो. गोविंदाच्या हाताचा स्पर्ष झाला तर दहीहंडी फुटली असे समजले जाते. स्पर्ष झाला नाही तर दुसऱ्या पथकाला संधी दिली जात असते. गोविंदाची हवेतील उडी अचूक असणे गरजेचे असते, कारण गोविंदाने हंडी फोडणाऱ्या गोविंदाने विहीरीच्या मधोमध पाण्यात पडणे अपेक्षित असते. थोडी चूक झाली तर गोविंदा विहीरीच्या कठड्यावर आपटून तो जखमी होऊ शकतो. त्यामुळे गोविंदा पथकांमधील इतर सहकारी विहीरीच्या कठड्यावर बसून त्याचे संरक्षण करत असतात.

# सलग सुट्ट्यांमुळे महाबळेश्वरमध्ये पर्यटकांची गर्दी

**सातारा :** सलग सुट्ट्यांमुळे महाबळेश्वर,पाचगणी पर्यटकांनी बहरून गेले आहे. मोठ्या संख्येने दाखल झालेले पर्यटक पावसाळी पर्यटनाचा आनंद लुटत आहेत. लिंगमळा धबधब्यासह वेण्णालेक, ऑर्थरसिट पॉईंट यासह विविध पॉईंटवर पर्यटकांची गर्दी पहायला मिळत आहे. बाजारपेठेतही पर्यटक फेरफटका मारताना गर्दी दिसत आहेत. लिंगमळा धबधब्यासह वेण्णालेकवर पर्यटकांची गर्दी आहे. पोलिसांनी वाहतुकीचे नियोजन केले आहे. भर पावसात पर्यटकांची व त्यांच्या वाहनांची मोठी गर्दी महाबळेश्वर पाचगणी येथे आहे. स्वातंत्र्यदिनापाठोपाठ श्रीकृष्ण जन्माष्टमी व रविवार अशा सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे महाबळेश्वर गजबजले आहे. शहरासह परिसरातील रिसॉर्ट्स, रेस्टॉरंटसह, हॉटेलमध्ये केलेली आकर्षक सजावट पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. सध्या अधूनमधून काहीशी पावसाची रिमझिम सुरु आहे. एक महिना आधीपासून पर्यटकांनी हॉटेल्स, लॉजिंग, व्हिला, बंगलो आदी आरक्षित केल्याने शहरात ऐनवेळी दाखल होणाऱ्या पर्यटाकांना हॉटेल्ससाठी शोधाशोध करावी लागत आहे. प्रसिद्ध केट्स लॉडविक पॉईंटसह ठिकठिकाणी पर्यटकांची रेलचेल अनुभवायला मिळत आहे.



## म ह त्वा चे

### दारूला पैसे न दिल्याने मुलाकडून आईवर हल्ला

**पुणे :** पुण्यातून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. दारु पिण्यासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने एका तरुणाने त्याच्या आईवर जीवघेणा हल्ला केला. तरुणाने चाकून सपासप वार करत आईला जखमी केले. हत्येचा प्रयत्न केल्या प्रकरणी पर्वती पोलिसांनी आरोपी तरुणाला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कृष्णा कांबळे (वय ३० वर्षे, राहणार सावित्रीबाई फुले वसाहत, सिंहगड रस्ता) असे आरोपी तरुणाचे नाव आहे. तर कौशल्या कांबळे (वय ५५ वर्षे) असे तरुणाच्या आईचे नाव आहे. आरोपीचा मोठा भाऊ बाबासाहेब याने या प्रकरणी पर्वती पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर आरोपीला अटक झाली आहे. आरोपीला दारुचे आणि अन्य गोष्टींचे व्यसन आहे. तो नोकरी किंवा काही कामधंदा करत नाही. तो आईच्या पैशांवर उदरनिर्वाह करतो. दारु पिण्यासाठीही तो आईकडून पैसे घेत असे. दारुसाठी पैशांची मागणी करुन आरोपी आईला त्रास द्यायला. पैसे न दिल्यास आरोपी कृष्णा हा त्याच्या आईशी गैरवर्तन करत असे, तिला शिव्या देत असे.

### एसीच्या स्फोटात महिलेचा मृत्यू

**सोलापूर :** सोलापूर शहरात भीषण घटनेत एका महिलेचा आगीत होरपळून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. जुन्या विडी घरकुल परिसरातील गाडगी नगर येथे शनिवारी पहाटे ही घटना घडली. पल्लवी प्रवीण सग्गम (वय 40) असे मृत महिलेचे नाव असून, घरातील एसीचा स्फोट होऊन शॉर्टसर्किट झाल्यामुळे ही आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार सलग तीन दिवस आलेल्या सुट्ट्यांमुळे पल्लवी सग्गम घरीच होत्या. अचानक मोठा आवाज झाला आणि काही क्षणांतच संपूर्ण घर धुराने व ज्वाळांनी वेढले गेले. स्थानिकांनी तात्काळ ओरडून शेजाऱ्यांना बोलावले. नागरिकांनी अग्निशामक दलाला माहिती दिल्यानंतर ते घटनास्थळी दाखल झाले. मात्र आग एवढ्या झपाट्याने पसरली की महिलेचे प्राण वाचवणे शक्य झाले नाही. पल्लवी यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला.

### 'जिलेबी डे' साजरा करत कोल्हापूरकरांनी केली 60 टन जिलेबी फस्त

**कोल्हापूर :** देशभरात 79 वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा होतोय. मात्र कोल्हापुरात स्वातंत्र्य दिनाचा आनंद द्विगुणीत केला जातो. तो म्हणजे जिलेबीचा आस्वाद घेऊनच. कोल्हापुरात हर घर जिलेबी! ही परंपरा गेली कित्येक वर्षे आपसुकच जपली गेलीय. 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दिवशी तिरंगा ध्वज उंचावला की, कोल्हापुरकर थेट जिलेबीच्या स्टॉलपाशी पोहोचतात. घरच्या वाटेवर गरमागरम जिलेबीची पिशवी नसली, तर कोल्हापूरकरांना हा राष्ट्रीय सण अपुराच वाटतो. 15 ऑगस्ट दिवशी कोल्हापुरातील चौकाचौकात, गल्लीबोळात जिलेबीचे स्टॉल लावले जातात. तव्यावर फिरणाऱ्या गरम तेलातली सोनसळी जिलेबी, त्यातून उठणारा सुगंध, आणि देशभक्तीपर गाणी यामुळं कोल्हापूर एका वेगळ्याच गोड वातावरणात सामावून जात असतात. गरीब-श्रीमंत, दुकानदार-कामगार सर्वांच्या ताटात या दिवशी नक्कीच जिलेबी असते. कोल्हापूरची ओळख ही कुस्तीची पंढरी म्हणून जगप्रसिद्ध आहे.

# भावकीकडे लक्षं दिलं म्हणूनच तू आमदार झालास...

## अजितदादांचा रोहित पवारांना जोरदार टोला

प्रतिनिधी
■ सांगली



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुट पडल्यानंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अर्थात अजित पवार, शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि शरद पवार गटाचे आमदार तथा अजित पवारांचे पुतणे रोहित पवार हे आज एकाच मंचावर आले. यावेळी रोहित पवारांनी अजित पवारांना भावकीवरुन डिवचले. त्यानंतर भाषणाला उभे राहिलेले अजित पवार यांनी 'भावकीमुळेच तू आमदार झाला' असे म्हणत रोहित पवारांच्या टीकेची सव्याज परफेड केली. यावेळी जयंत पाटील यांनी अजित पवारांच्या बोलण्यामुळे चेहऱ्यावरील रेषही ढळू दिली नाही.

सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज नारायण पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचा उद्घाटन सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार जयंत पाटील, आमदार रोहित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील असे विविध पक्षांचे नेते एकाच मंचावर उपस्थित होते. यावेळी अजित पवार आणि रोहित पवार यांच्यात जोरदार जुगलबंदी रंगली .

रोहित पवार पहिल्यांदा बोलत होते, ते म्हणाले, आम्ही पक्षात एकत्र असताना विधानसभेत मी कसा बोलतो यावर अजित पवार यांचे लक्ष राहायचे. सभागृहात पहिले भाषण झाले तेव्हा त्यांनी मला घरी बोलावून घेतले आणि भाषणाचे कौतूक केले. त्यासोबतच सांगितले की, सभागृहात बोलत असताना शर्टचे बटन वरपर्यंत लावले पाहिजे, असे बारकाईन त्यांचे माझ्याकडे लक्ष होते. आता अजितदादा गावकीचा विचार करतात, मात्र भावकीला विसरले. रोहित पवार यांनी जोरदार राजकीय फटकेबाजी केली. अजितदादा अर्थमंत्री आहेत, निधी बाबत त्यांनी जरा विचार करावा, अशी विनंती त्यांनी पुढे केली. त्यानंतर भाषण करत असताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी रोहित पवारांच्या भावकीचा संदर्भ देत जोरदार पलटवार केला. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, 2004 ला मला वरिष्ठ विचारपूस करायला लागले. पण काहीकाही जणं पहिल्या टर्मलाच बोलायला लागले. त्यांना वाटतं की मी मोठ्ठा झालो पाहिजे.

# नाशिकमध्ये स्थानिक नागरिकांवर दादागिरी करणाऱ्या परप्रांतीयाला मनसेकडून चोप

प्रतिनिधी
■ नाशिक



नाशिकच्या पंचवटी परिसरातील एका इमारतीत परप्रांतीय व्यक्तीकडून स्थानिक रहिवाशांवर दादागिरी, असभ्य वर्तन आणि त्रास दिल्याची घटना उघडकीस आली आहे. या परप्रांतीय व्यक्तीने महिलेसमोर अर्धनग्न अवस्थेत फिरणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, अंतर्वस्त्रे बाहेर वाळत घालणे यांसारखे आक्षेपार्ह प्रकार सुरू केल्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. या वर्तनाविरोधात तक्रार करण्यासाठी गेलेल्या एका महिलेकडेही संबंधिताने धाव घेतल्याची धक्कादायक घटना घडली. यानंतर स्थानिक रहिवाशांनी मनसेकडे (MNS) धाव घेतली. मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी परप्रांतीय नागरिकाला चांगलाच चोप दिला आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपीची ओळख त्रिपाठी नावाच्या परप्रांतीय व्यक्ती म्हणून झाली असून, त्याच्या मालकीचे एकाच इमारतीत सात फ्लॅट आहेत. विशेष म्हणजे, याच निवासी इमारतीत त्याने 'अलोक सिक्युरिटी सर्व्हिसेस' या नावाने व्यावसायिक कार्यालय सुरू केलं आहे. स्थानिक नागरिकांच्या आरोपानुसार, त्रिपाठीने इमारतीतील अन्य फ्लॅटधारकांना त्रास देऊन त्यांचे फ्लॅट बळकावण्याचा प्रयत्न केला. यामुळे संपूर्ण इमारतीत भीतीचं आणि तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. या त्रासाला कंटाळून हतबल झालेल्या स्थानिकांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडे तक्रार केली. मनसेचे कार्यकर्ते घटनास्थळी दाखल झाल्यानंतर परप्रांतीय व्यक्तीने त्यांच्याशी अरेरावी आणि अश्लील भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर मनसे पदाधिकाऱ्यांनी त्या व्यक्तीला चांगलाच चोप दिला. यानंतर त्रिपाठीने सिक्युरिटी एजन्सीचे बाऊन्सर्स बोलावून नागरिकांना धमकावण्याचा प्रयत्न केला.

# रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा धुमाकुळ

## संगमेश्वर माखजन बाजारपेठेत पुराचे पाणी शिरले

प्रतिनिधी
■ रत्नागिरी



रत्नागिरी जिल्ह्यात कोसळणा-या पावसाने चांगलाच धुमाकुळ घातला आहे. सतत पडणा-या पावसामुळे दापोलीसह, खेड, चिपळूण व संगमेश्वर तालुक्यांना झोडपून काढले आहे. संगमेश्वर माखजन बाजार पेठेत पुन्हा पाणी शिरल्याने दहा पेक्षा जास्त दुकाने पाण्याखाली गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले. मध्यरात्री पाणी शिरल्याने दुकानदारांची तारांबळ उडाली.

जिल्ह्यात गेले दोन दिवस पडणाऱ्या संततधार पावसाचा फटका माखजन बाजारपेठेला बसला आहे. पावसाचा जोर वाढल्याने गडनदीच्या पुराचे पाणी माखजन बाजारपेठेतील १० पेक्षा जास्त दुकानात घुसल्याने व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. रक्षाबंधन गोकुळाष्टमी व पाठोपाठ येणाऱ्या गणेश उत्सवामुळे अनेक दुकानात या सणासुदीचा माल भरलेला असल्याने व्यापाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. काही व्यापाऱ्यांना माल बाहेर न काढता आल्याने मोठे नुकसान झाले आहे. तसेच माखजन बाजार पेठेतून सरंद गावाकडे येणारा रस्ता गडनदीच्या पाण्यामुळे वाहतुकीसाठी बंद झाला.

## अमरावतीचे 'इंडिसेंट प्रपोजल' प्रकरण तापले

# माहिती अधिकाऱ्याच्या पत्नीची उपोषणस्थळी जावून पत्रकार महिलेला धमकी!

प्रतिनिधी
■ अमरावती

स्वातंत्र्यदिनी जालन्यात उपोषणकर्त्यांना पालकमंत्र्यांना भेटू न देता पोलीस उपअधीक्षकाने उडी घेत त्यांच्या कमरेत लाथ घातल्याचे छायाचित्र राज्यात एकीकडे गाजत आहे. तर दुसरीकडे अमरावती येथे जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांच्या पत्नीने एका पत्रकार महिलेला उपोषण स्थळी जावून धमकी दिल्याची घटना स्वातंत्र्य दिनीच घडली आहे. त्यामुळे गेले काही दिवस राज्यात गाजत असलेले माहिती अधिकाऱ्याचे 'इंडिसेंट प्रपोजल'चे प्रकरण चांगलेच तापले आहे.

या प्रकरणात उपोषणकर्त्या पत्रकार वंदना तळखंडे यांनी स्थानिक गाडगे नगर पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करत कोटुरवार आणि त्यांच्या पत्नीवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. 'माझ्या पतीच्या विरोधात सुरू केलेले उपोषण बंद कर. अन्यथा तुला बरबाद करुन टाकेन. आमच्यावर कोणतीही कारवाई होणार नाही', अशी धमकी आपणांस कोतुरवार यांच्या पत्नीने दिली, असे वंदना तळखंडे यांनी सांगितले. त्या अधिस्वीकृतीधारक पत्रकार आहेत. विदर्भातील राज्य सरकारच्या जाहिरात पात्र वृत्तपत्रांच्या यादीत समाविष्ट असलेल्या आणि गेली १० वर्षे प्रसिद्ध होणाऱ्या एका साप्ताहिकाची त्या संपादिका आहेत.

पत्रकार वंदना तळखंडे यांचे एक स्थानिक दैनिकही पाच वर्षांपासून अमरावती येथून प्रसिद्ध होत आहे. त्या वृत्तपत्राला राज्य सरकारच्या जाहिरातींसाठी पात्र ठरवण्याच्या बदल्यात शरीरसुख देण्यासाठी माहिती अधिकारी गजानन कोटुरवार यांनी आपला पिच्छा पुरवला, अशी त्यांची तक्रार आहे. या प्रकरणात कारवाईसाठी त्यांनी १४ ऑगस्टपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

ऑगस्ट २०२४ मध्ये अमरावतीला रुजू झालेल्या त्या माहिती अधिकाऱ्याचे 'इंडिसेंट प्रपोजल' (असभ्य प्रस्ताव) आपण धुडकावून लावले. त्याचा सूडही आपल्यावर त्यांनी उगवला आहे, असा स्पष्ट आरोप या पत्रकार महिलेने केला आहे. आपली अधिस्वीकृती पत्रिका ३ एप्रिल २०२५ रोजीच्या एका पत्राद्वारे कोटुरवार यांनी रद्द केली आहे, अशी माहिती तिने दिली आहे.

# रत्नागिरीतील नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी

■ रत्नागिरी

गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे. याचाच परिणाम म्हणून कोकण आणि घाटमाथ्यावर अतिमुसळधार पाऊस कोसळत आहे. राज्यातील इतर भागातही पावसाचा जोर असला तरी कोकण, घाटमाथ्यावर पावसाचे प्रमाण अधिक आहे. दरम्यान, मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. मागील १५ दिवस पावसाने विश्रांती घेतली होती. त्यानंतर पुन्हा शुक्रवारपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग भागात गुरुवारपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. या भागात शनिवारी पहाटेपासून पावसाचा जोर पुन्हा वाढला असून रायगड जिल्ह्यातील कुंडलिका आणि अंबा नद्यांनी पाण्याची इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे रोहा, कोलाड, वाकण, खारघाव, खेड या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, रत्नागिरीसह रायगड, पुणे घाट परिसर , सातारा घाट परिसरात शनिवारी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर सायबर अटॅक

## ग्राहकांच्या व्यवहारांची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचल्याची भीती

प्रतिनिधी
■ अमरावती




अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखालील अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर मोठा सायबर हल्ला झाला आहे. त्यामुळे खातेधारकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बँकेच्या नेटवर्क आणि ग्राहकांच्या व्यवहारांची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात मिळालेल्या माहितीनुसार या सायबर हल्ल्यात बँकेच्या बडनेरा आणि मंगरूळ दस्तगीर शाखांना विशेषतः लक्ष्य करण्यात आले होते. असे सांगितले जात आहे की, बँकेच्या इतर शाखा देखील सायबर हल्लेखोरांच्या रडारवर आहेत. धक्कादायक बाब म्हणजे हल्लेखोरांनी थेट बँकेच्या संगणक प्रणालीमध्ये प्रवेश केला आणि विंडोज होल्डरवर एक नवीन फाइल तयार केली. यामुळे बँकेच्या नेटवर्क आणि ग्राहकांच्या व्यवहारांची माहिती हॅकर्सपर्यंत पोहोचल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या घटनेनंतर बँकेत मोठी खळबळ उडाली आहे आणि सुरक्षा व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी शनिवारी संचालक मंडळाची आपत्कालीन बैठक बोलावली आहे. या बैठकीत बँकेच्या आयटी सुरक्षेवर आणि सायबर हल्ल्याच्या चौकशीसाठी पुढील पावले उचलण्यावर चर्चा केली जात आहे.

# बायको नांदायला येत नसल्याने नवऱ्याने 4 मुलांसह आयुष्य संपवलं

प्रतिनिधी
■ अहिल्यानगर



अहिल्यानगरमध्ये हृदय पिळवून टाकणारी धक्कादायक घटना घडली आहे. बायको नांदायला येत नाही म्हणून नवऱ्याने मुलांसह आयुष्य संपवलं आहे. पोटच्या मुलांना विहिरीत ढकलून बापाने स्वत: आत्महत्या केली. राहाता तालुक्यातील को-हाळे शिवारातील घडलेल्या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता तालुक्यातील को-हाळे शिवारातील व्यक्तीने मुलांसह आत्महत्या केल्याची घटना घडली. या व्यक्तीने मुलांना विहिरीत ढकलून स्वत:ही आत्महत्या केल्याचं उघड झालं. या व्यक्तीसह दोन मुलांचे मृतदेह बाहेर काढण्यात यश आहे. आता आणखी बेपत्ता मुलांचा शोध सुरु आहे.

अरुण काळे असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. ३० वर्षीय अरुण काळे हे श्रीगोंदा तालुक्यातील चिखली कोरेगावात एक मुलगी आणि तीन मुलांसह राहत होते. अरुण काळे यांचा एक हात आणि एक पाय दोरीने बांधलेल्या अवस्थेत विहिरीत मृतदेह आढळला. त्यांनी स्वत:चे हात पाय बांधून आत्महत्या केल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शिवानी अरुण काळे ( वय 8 ) , प्रेम अरुण काळे ( वय 7 ) वीर अरुण काळे ( वय 6 ) , कबीर अरुण काळे ( वय 5 ) अशी मृत मुलांची नावे आहेत. मुले हे शाळेच्या गणवेशात होती. सतत होणाऱ्या वादा -वादीमुळे बायको आठ दिवसांपूर्वी येवला येथे माहेरी गेली होती.

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचं आंदोलन

प्रतिनिधी
■ सांगली



सांगली जिल्ह्यातील बुधगाव येथे शक्तीपीठ महामार्गाविरोधात बाधित शेतकऱ्यांचा तिरंगा मेळावा पार पडला. “शक्तीपीठ नको माझ्या वावरात” आणि “तिरंगा फडकतो आमच्या शिवारात” अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी प्रशासनाविरोधात एल्गार केला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी या आंदोलनाचे नेतृत्व करत मोजण्या तात्काळ थांबवाव्यात, अन्यथा कलेक्टर ऑफिसलाच टाळे ठोकण्याचा इशारा दिला. देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या शक्तीपीठ महामार्गासाठी प्रशासनाने जबरदस्तीने सुरू केलेल्या मोजण्यांना शेतकऱ्यांचा कडाडून विरोध असून, आता राज्यातील १२ जिल्ह्यांतील बाधित शेतकरी एकत्र येऊन मोठ्या आंदोलनाची तयारी करत आहेत.

# यूट्यूबवरुन शिकून बनावट नोटा छापण्याचा कारखाना टाकला

## इचलकरंजीत पोलिसांच्या तिघांना बेड्या; 2,94,900 चा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी
■ इचलकरंजी

इचलकरंजी-तील मंगळवार पेठ परिसरात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या (LCB) पथकाने छापा टाकून बनावट नोटा छापण्याचा कारखाना उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईतून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी यूट्यूबवरील व्हिडिओ पाहून बनावट नोटा छापण्याचे कौशल्य आत्मसात केले होते. या माध्यमातून त्यांनी आधुनिक प्रिंटिंग मशिन, स्कॅनर आणि संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च दर्जाच्या बनावट नोटा छापण्याचा प्रयत्न केला होता.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत उघड झाले की, आरोपींनी गेल्या काही महिन्यांपासून या व्यवसायाला सुरुवात केली होती. इंटरनेटवरील व्हिडिओमधून मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी यंत्रसामग्री खरेदी करून घरातच नोटा छापण्याची प्रक्रिया सुरू केली. या कारवाईत लाखोंच्या किमतीच्या बनावट नोटा, कागद, शाई आणि यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे.

बनावट नोटा छापून त्या बाजारात पुरवण्याचा त्यांचा डाव होता, मात्र LCB पथकाने वेळेत कारवाई करून हा कट उधळला. बनावट नोटा या मूळ नोटांसारख्याच भासणाऱ्या असल्याने सामान्य नागरिकांची मोठी फसवणूक होऊ शकली असती.या प्रकरणात काही आरोपींना अटक झाली असून त्यांच्याकडून इतर भागांतील गुन्हेगारी साखळी बद्दल माहिती मिळवली जात आहे.

# शिर्डीच्या साईबाबा मंदिरातही श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी

## दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी, पाहा दहीहंडीचा जल्लोष

प्रतिनिधी
■ शिर्डी



श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव देशभरात मोठ्या भक्तीभावात साजरा करण्यात आला. साईबाबांना श्रीकृष्णाचा अवतार मानत या पावन दिवशी साईबाबांचं दर्शन घेण्यासाठी आणि दहीहंडीचा उत्सव साजरा करण्यासाठी असंख्य भाविक साईदरबारी हजेरी लावतात. तर शुक्रवारी मध्यरात्री 12 वाजता साई मंदिरात श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरा करण्यात आला.

**बाळकृष्णाचं मोठ्या उत्साहात स्वागत :** साईबाबांच्या समाधी मंदिरात चांदीच्या पाळण्यात श्रीकृष्णाची चांदीची मूर्ती ठेवून बाल कन्हैयाचं गुणगान करण्यात आलं. साई समाधी मंदिरासमोरील स्टेजवर ह.भ.प. स्मिता आजेगावकर यांनी रात्री 10 ते 12 दरम्यान सादर केलेल्या कीर्तनाला उत्तम प्रतिसाद लाभला. त्यानंतर मध्यरात्री बारा वाजता साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सपत्नीक पाळणा हालवत बाळकृष्णाच्या जन्माचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं. यावेळी शिर्डी ग्रामस्थ आणि साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्रीकृष्ण जन्मोत्सव कार्यक्रमानंतर मध्यरात्री 12.30 वाजता साईबाबांच्या शेजारतीला सुरुवात करण्यात आली.

'सबका मालिक एक'चा महामंत्र देणाऱ्या शिर्डी साईबाबांनी आपल्या जीवनकाळात अनेक लीला दाखवल्या. साईबाबांनी एका भक्ताला कृष्णाच्या रूपात दर्शन दिल्याचं म्हटलं जातं. त्यामुळं देशभरातील हजारो भाविक श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव साईबाबांच्या शिर्डीत साजरा करण्यासाठी येतात.

**साई समाधीवर गोपाळ कृष्णाचा फोटो ठेवून पूजा:** आज गोपाळकाल्याच्या दिवशी दिवसभर साई समाधीवर गोपाळ कृष्णाचा फोटो ठेवून त्याची पूजा केली जाते. तर दुपारी मध्यान्ह आरती अगोदर बारा वाजता साई समाधीसमोर दहीहंडी फोडली जाते.

पान 1 वरुन

### मुंबईसहीत सर्व महापालिकांची हंडी आम्हीच फोडणार

मुंबईतील दहीहंडी उत्साहात यंदा नव्या विक्रमांची शर्यत प्रेक्षकांना अनुभवायाला मिळाली. घाटकोपर येथे मनसे गणेश चुक्कल, अरविंद गिते मित्र परिवार आयोजित दहीहंडीमध्ये " जय जवान गोविंदा पथकाने १० थरांची हंडी लावून नवीन विक्रम रचला. त्याचबरोबर ठाण्यातील प्रताप सरनाईक यांच्या संकल्प प्रतिष्ठाण आयोजित दही हंडी उत्सवात कोकण नगर गोविंदा पथकाने १० थरांचा विश्वविक्रम केला. कोकण नगर गोविंदा पथकाने केलेल्या विक्रमानंतर मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंडळाला तब्बल २५ लाखांचे बक्षीस जाहीर केले. ९ थर लावणाऱ्या गोविंद पथकांना ११ लाखांचे बक्षीस तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. त्याचबरोबर ८ थर लावणाऱ्या गोविंदा पथकाला २५ हजार व आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

### ट्रम्प-पुतिन बैठक निष्फळ

दोन्ही नेत्यांनी 'अलास्का २०२५' लिहिलेल्या व्यासपीठावर उभे राहून पोज दिली. त्यांच्या मागे एक B2 बॉम्बर विमान आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे अधिकृत विमान, एअर फोर्स वन होते.

### मुंबईत पावसाचा काला...

मुंबईत शनिवारी सकाळी ८.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत शहर भागात ५४.५९ मिमी, पूर्व उपनगरात १९.३७ मिमी. तर पश्चिम उपनगरात ३९.०२ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात करण्यात आली आहे.ग्रँट रोड येथे १०० मिमी, सीएसएमटी - ९६ मिमी, भांडूप - ३९ मिमी, मुलुंड - ३५ मिमी, ट्रॉम्बे - ३० मिमी, पवई - २८ मिमी, मालाड - ५६ मिमी, कांदिवली - ५३ मिमी आणि बोरिवली - ४६ मिमी इतक्या पावसाची नोंद करण्यात आली. त्याचप्रमाणे, आगामी २४ तासात ४० ते ६० प्रति तास किमी वेगवान वाऱ्यासह काही ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप


**मुंबई :** सायन पूर्वेकडील जोगळेकर वाडी महानगरपालिका शाळा संकुलातील सुप्रसिध्द "पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाच्या वतीने "ज्ञान विकास नाईट हायस्कूल" मधील रात्र शाळेतील इयत्ता आठवी, नववी आणि दहावीतील नवोदित विद्यार्थ्यांना मोफत शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शालेय शिक्षणाची गोडी वाढावी, शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने प्रिन्सिपल परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या शालेय वस्तू शिक्षक सुर्यवंशी, पोकळे, अजित नाईक यांनी ए बल एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा समाज सेविका अनुराधा गणेश बींगी, मासूम संस्थेच्या साऊथ झोन प्रोजेक्ट मॅनेजर स्नेहल गायकवाड, समाजसेवक जितेंद्र कांबळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, मराठी शाळांचे अस्तित्व टीकवणे हा मुख्य उद्देश असल्याचे अनुराधा गणेश बींगी म्हणाल्या.



## ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार, प्रशिक्षक बॉब सिम्पसन कालवश

**वृत्तसंस्था**
■ **सिडनी**

ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक बॉब सिम्पसन यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी सिडनी येथे निधन झाले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने १६ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या निधनाची अधिकृतपणे पुष्टी केली. सिम्पसन केवळ एक हुशार फलंदाज आणि एक उत्कृष्ट स्लिप फिल्डर नव्हते तर प्रशिक्षक म्हणून त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेटला नवीन उंचीवर नेले. सिम्पसन यांनी १९५७ मध्ये कसोटी पदार्पण केले आणि १९७८ पर्यंत खेळत राहिले. त्यांनी एकूण ६२ कसोटी सामने खेळले, ज्यामध्ये त्यांनी ४,८६९ धावा केल्या आणि १० शतके ठोकली. १९६४ मध्ये इंग्लंडविरुद्ध ३११ ही त्यांची सर्वोत्तम धावसंख्या होती. फलंदाजीव्यतिरिक्त, ते लेग स्पिनर देखील होते आणि त्यांनी ७१ विकेट्स घेतल्या.



### स्लिपमध्ये झेलांचे शतक

स्लिप फिल्डिंगमध्ये बॉब यांचा पराक्रम इतका होता की त्यांनी ११० झेल घेतले, जे अजूनही नॉन-विकेटकीपरसाठी एक विक्रम मानले जाते. त्यांनी एकूण ३९ कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले. १९७७ मध्ये, जेव्हा संघाची घसरगुंडी सुरू होती, तेव्हा ते ४१ वर्षांच्या वयात पुन्हा कर्णधार म्हणून परतले.

## कोलकात्यातून सुरु होणार मेस्सीचा भारत दौरा

### 15 डिसेंबरला कोहली आणि गिलसोबत फुटबॉल खेळणार
### पंतप्रधान मोदींच्या भेटीने दौऱ्याचा समारोप

**वृत्तसंस्था**
■ **ब्युनोस आयर्स**

फुटबॉल सुपरस्टार लिओनेल मेस्सीच्या भारत दौऱ्याला अखेर मंजुरी मिळाली आहे. अर्जेंटिनाच्या सुपरस्टारचा ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाइम (GOAT) भारत दौरा १२ डिसेंबर रोजी कोलकाता येथून सुरू होईल. त्यानंतर ते अहमदाबाद, मुंबई आणि दिल्लीला जातील. १५ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीने हा दौरा संपेल.

मेस्सी दिल्लीत विराट कोहली आणि शुभमन गिलसोबत एक मैत्रीपूर्ण फुटबॉल सामना खेळणार आहे. २०११ नंतर तो पहिल्यांदाच भारतात येत आहे. त्यावेळी मेस्सी अर्जेंटिना संघासोबत कोलकात्यातील साल्ट लेक स्टेडियमवर व्हेनेझुएलाविरुद्ध मैत्रीपूर्ण सामना खेळण्यासाठी आला होता.



### सर्वात मोठ्या पुतळ्याचे अनावरण

१३ डिसेंबरला मेस्सीच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या पुतळ्याचे अनावरण केले जाईल. त्यानंतर GOAT कॉन्सर्ट आणि ७ खेळाडूंचा फुटबॉल सामना होईल ज्यामध्ये मेस्सी सौरव गांगुली, लिएंडर पेस, जॉन अब्राहम आणि बायचुंग भुतिया यांच्यासोबत खेळेल.या दौऱ्यादरम्यान, २५ फूट उंच आणि २० फूट रुंद असलेले एक मोठे भित्तीचित्र (भिंतीवर बनवलेले चित्र किंवा कलाकृती) देखील बनवले जाईल ज्यावर चाहते संदेश लिहू शकतील. हे भित्तीचित्र नंतर मेस्सीला दिले जाईल.कोलकाता नंतर, मेस्सी १३ डिसेंबर रोजी संध्याकाळी अहमदाबाद येथे अदानी फाउंडेशनच्या एका खाजगी कार्यक्रमात सहभागी होईल. त्यानंतर १४ डिसेंबर रोजी मुंबई सीसीआय ब्रेबॉर्न क्लबमध्ये भेट-अभिवादन होईल, त्यानंतर वानखेडे येथे GOAT कॉन्सर्ट आणि GOAT कप होईल. यामध्ये मेस्सी शाहरुख खान, लिएंडर पेस आणि इतर सेलिब्रिटींसोबत पॅडल वाजवेल.

### कोलकातामध्ये २ दिवस राहणार

इव्हेंट प्रमोटर सताद्रु दत्ता यांच्या मते, मेस्सी या दौऱ्यात भारतातील तरुण फुटबॉलपटूंना प्रेरणा देण्यासाठी मुलांना फुटबॉल मास्टरक्लासेस देईल. तो १२ डिसेंबरच्या रात्री कोलकाता येथे पोहोचेल आणि येथे दोन दिवस राहणार आहे.१३ डिसेंबर रोजी सकाळी भेट-अभिवादन, खास जेवण आणि चहा महोत्सव होईल. मेस्सीला अर्जेंटिनाची मेट चहा आवडते, म्हणून अर्जेंटिना आणि आसाम चहाचे मिश्रण असेल. बंगाली मासे आणि मिठाई देखील दिल्या जातील.

## आफ्रिदीने कुत्र्याचं मांस खाल्लं आहे, म्हणूनच तो भुंकतोय...

### इरफान पठाणने केली होती आफ्रिदीची बोलती बंद




**वृत्तसंस्था**
■ **नवी दिल्ली**

टीम इंडियाचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण सध्या सोशल मीडियावर आणि मुलाखतींमध्ये त्याच्या स्पष्टवक्तेपणामुळे खूप चर्चेत आहे. नुकत्याच एका मुलाखतीत त्याने एक जुना किस्सा सांगितला, जेव्हा पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीशी त्याची फ्लाइटमध्ये बाचाबाची झाली होती. त्याने आफ्रिदीला असं उत्तर दिलं होतं की आफ्रिदी देखील एकदम गप्प झाला होता.

या बाचाबाचीच्या घटनेनंतर तर गोष्ट आणखी वाढली. फ्लाइटमध्ये पठाणने आपल्या शेजारी बसलेल्या पाकिस्तानी अष्टपैलू अब्दुल रझाकला मस्करीत विचारलं की, पाकिस्तानात कोणत्या प्रकारचं मांस मिळतं. रझाकने पठाणला विचारलं की तू असं का विचारतो आहेस आणि मग पाकिस्तानात मिळणाऱ्या वेगवेगळ्या मांसाबद्दल सांगितलं. पण पठाणने शेजारी बसलेल्या आफ्रिदीची मस्करी करत म्हटलं, "इथे कुत्र्याचं मांस पण मिळतं का?. इरफानने खुलासा केला की हे ऐकून रझाक अवाक् झाला, तर शेजारी बसलेला आफ्रिदी विचारात पडला. त्याचवेळी पठाणने आफ्रिदीला टोमणा मारत म्हटलं, आफ्रिदीने कदाचित कुत्र्याचं मांस खाल्लं आहे, म्हणूनच तो इतका भुंकतोय.

पठाणने नुकतीच लल्लनटॉपला मुलाखत दिली. या दिलेल्या मुलाखतीत त्याने सांगितलं की, २००६ मध्ये भारतीय संघ सामना खेळण्यासाठी पाकिस्तान दौऱ्यावर गेला होता. कराचीहून लाहोरला जाण्यासाठी दोन्ही संघांसाठी एकच फ्लाइट होती. सर्व खेळाडू एकत्र प्रवास करत होते, तेव्हा आफ्रिदीने मस्करी करत इरफानचे केस विस्कटवले होते आणि मजेत त्याला 'बाळ' म्हणाला होता. इरफानला ही गोष्ट अजिबात आवडली नाही आणि त्याने तात्काळ प्रत्युत्तर देत आफ्रिदीला म्हटलं, "तू कधीपासून माझा बाप झालास?" हे ऐकून आफ्रिदीला खूप राग आला आणि तो इरफान पठाणला शिवीगाळ करू लागला. पठाणच्या म्हणण्यानुसार, या टिप्पणीनंतर आफ्रिदी संपूर्ण प्रवासात गप्प राहिला आणि त्याने पठाणशी त्यानंतर बोलणं टाळलं. इरफानने हसत सांगितलं की, त्याला समजलं की माझ्याशी शाब्दिक युद्धात तो जिंकू शकत नाही. त्यानंतर त्याने मला कधीच काही बोलण्याचा प्रयत्न केला नाही.

## बीओबी बुध्दिबळ स्पर्धेत श्लोकला चकवून मानस गटविजेता

■ **मुंबई**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित बीओबी ट्रॉफी १३ वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धेत फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटू मानस हाथीने (५ गुण) निर्णायक पाचव्या साखळी फेरीत संयुक्त आघाडीवरील फिडे गुणांकित श्लोक पवारला (४ गुण) चकवून गटविजेतेपद पटकाविले. प्रथम मानांकित मानस हाथीने आक्रमक चाली रचत चतुर्थ मानांकित श्लोक पवारच्या राजाला २७ व्या मिनिटाला शह दिला आणि प्रथम क्रमांकावर झेप घेतली. परिणामी श्लोकला द्वितीय क्रमांकावर समाधान मानावे लागले. फिडे इंस्ट्रक्टर राजाबाबू गजेंगी व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्यांना गौरविण्यात आले.



आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्याने बँक ऑफ बडोदा चषक १३ वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धेत नंद पाठकने (४ गुण) तृतीय, हुसैना राजने (४ गुण) चौथा, मैत्रेयी बेराने (४ गुण) पाचवा, अनय भांगरेने (४ गुण) सहावा क्रमांक मिळविला. ७ वर्षाखालील गटात लिया कृष्णनने (४.५ गुण) प्रथम, निर्वाण दर्यानानीने (४ गुण) द्वितीय, चैतन्या नगराळेने (३.५ गुण) तृतीय, रियान गालाने (३.५ गुण) चौथा, अनिश अगरवालने (३.५ गुण) पाचवा, संचित काळेने (३ गुण) सहावा तर १० वर्षाखालील गटात अहान कातारुकाने (५ गुण) प्रथम, नित्या बंगने (४ गुण) द्वितीय, आराध्य पुरोने (४ गुण) तृतीय. शिवांश गिरीने (४ गुण) चौथा, आदित गोखलेने (४ गुण) पाचवा, लक्ष परमारने (३.५ गुण) सहावा पुरस्कार जिंकला. राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष आमदार सचिनभाऊ अहिर व सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांचे स्पर्धेला मार्गदर्शन लाभले होते. विविध जिल्ह्यातील फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटूसह १६२ खेळाडूंच्या सहभागाने झालेल्या स्पर्धेत एकूण ९० पुरस्कार देण्यात आले.

## शहरात क्रीडांगणं व्हावी म्हणून 100 किमी धावला युवक

### स्वातंत्र्यदिनी पूर्ण केली 'सेल्फ अल्ट्रा मॅरेथॉन

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

उल्हासनगर शहरात क्रीडांगणं व्हावीत, चांगल्या दर्जाचं क्रीडा संकुल उभं राहावं, तरुणांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी या उद्देशानं एका तरुणानं १०० किलोमीटरची सेल्फ अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण केलीय. वांगणी ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर १० तास २० मिनिटांत पूर्ण करत स्वतःचाच विक्रमही प्रस्थापित केलाय. राकेश खापरे असं या तरुणाचं नाव असून त्याच्या या अनोख्या कृतीची सर्वत्र चर्चा होत आहे.

राकेश खापरे हा उल्हासनगरमधील कुर्ला कॅम्प परिसरातील रहिवासी असून, तो गेल्या अनेक दिवसांपासून या मॅरेथॉनसाठी तयारी करत होता.



दररोज २० किलोमीटर धावत, पोषक आहार घेत आणि मानसिक तयारी करत त्यानं स्वतःला या आव्हानासाठी तयार केलं. १५ ऑगस्टच्या मध्यरात्री, वांगणीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून त्यानं आपल्या १०० किलोमीटर धावण्याच्या प्रवासाला सुरुवात केली, जो थेट मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया या ऐतिहासिक स्थळी समाप्त झाला.

### युवकांसाठी प्रेरणादायी उपक्रम

राकेश खापरेनं १०० किलोमीटरची मॅरेथॉन फक्त स्वतःचा विक्रम म्हणून पूर्ण केली नाही, तर ती एक जिवंत घोषणाच होती 'खेळासाठी मैदानं हवीत, आणि तरुणांसाठी दिशा हवी!' त्याचं हे पाऊल आज लाखो तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्याचं हे धाडस केवळ धावण्याचं नव्हतं, तर एका समाजाच्या बदलाची चाहूल देणारं होतं

## निवासी/व्यावसायिक संकुलातील ओल्या कचऱ्याची त्रयस्थ संस्थांमार्फत वाहतूक करण्यावर बंदी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबईतील विविध आस्थापनांमध्ये निर्माण होणारा कचरा संकलित करण्याचे कार्य बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने अविरतपणे केले जाते. तथापि, एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) निवासी/व्यावसायिक संकुलातील ओल्या कचऱ्याची त्रयस्थ संस्थामार्फत वाहतूक करुन ते इतरत्र नेऊन टाकला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे, यापुढे एका ठिकाणी घाऊक प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या निवासी/व्यावसायिक संकुलातील ओल्या कचऱ्याची त्रयस्थ संस्थांमार्फत वाहतूक करण्यावर पूर्णपणे बंदी आहे. संबंधित निवासी/व्यावसायिक आस्थापनांनी त्याठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर जागच्या जागी प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे किंवा संबंधित कचरा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सुपूर्द करणे अनिवार्य आहे, असे स्पष्ट निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. तसेच, जागीच कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांना मालमत्ता करातून सवलतदेखील देण्यात येईल, असेही डॉ. जोशी यांनी सांगितले.



एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) निवासी/व्यावसायिक संकुलाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात काल आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्रीमती अश्विनी जोशी बोलत होत्या. उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर, प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) विनायक भट, सर्व विभागांतील सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, सहायक अभियंता आदी यावेळी उपस्थित होते.

मुंबईतील घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम, योजना राबविल्या जात आहेत. त्याच पार्श्वभूमीवर, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) निवासी/व्यावसायिक संकुलातील कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन व्हावे आणि ते इतरत्र कुठेही टाकले जाऊ नये, यासाठी व्यापक स्तरावर उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. दररोज १०० किलोपेक्षा अधिक कचरा निर्माण करणाऱ्या किंवा ५ हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या आस्थापनांचा मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्यांत (बल्क वेस्ट जनरेटर) समावेश होतो.

याबाबतचा आढावा घेतल्यानंतर डॉ. जोशी म्हणाल्या, मुंबईत सध्या मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) एकूण २ हजार ६०९ आस्थापना आहेत. त्यापैकी, एकूण ७८४ आस्थापनांच्या परिसरातच कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच, ७२७ आस्थापना त्रयस्थ संस्थांना संबंधित कचरा देतात. तर, १ हजार ९८ आस्थापना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे कचरा सुपूर्द करतात. तथापि, या सर्व आस्थापनांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी प्रत्येक विभागातील सहाय्यक मुख्य पर्यवेक्षकांनी दिनांक १५ ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीदरम्यान सर्वेक्षण करावे. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांची नावे, त्यांच्याकडे कचऱ्यावर प्रक्रिया होते किंवा नाही, होत असल्यास कोणत्या संस्थेमार्फत ती केले जाते, त्यासाठी किती शुल्क आकारले जाते, आदी बाबींचा आढावा घ्यावा, असे निर्देश डॉ. जोशी यांनी दिले आहेत. तसेच, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांनी यापुढे त्यांच्याकडील ओल्या कचऱ्याची त्रयस्थ संस्थांमार्फत वाहतूक करु नये. संबंधित ठिकाणी निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर जागच्या जागीच प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावावी अथवा संबंधित कचरा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सुपूर्द करावा. निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर जागच्या जागी प्रक्रिया करणाऱ्या आस्थापनांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मालमत्ता करात सवलत दिली जाते. संबंधित आस्थापनांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच आपला परिसर आणि पर्यायाने संपूर्ण मुंबई स्वच्छ ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही डॉ. अश्विनी जोशी यांनी यावेळी केले.

## बेकायदेशीर बेमुदत संपावर गेलेल्या अधिकाऱ्यांची वेतनकपात करून शिस्तभंगाची कारवाई करावी

### अध्यक्ष टीडीएफ जनार्दन जंगले यांची मागणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्यातील कोट्यावधी विद्यार्थ्यांना वाऱ्यावर सोडून बेकायदेशीर बेमुदत संपावर जाऊन शिक्षणातील हजारो कोटींचा भ्रष्टाचार उघड करणाऱ्या चौकशीत अडथळा व दबाव आणणाऱ्या शिक्षण संचालक व तत्सम बेजबाबदार उच्चपदस्थ व अधिकाऱ्यांचे, लोकसेवकांचे वेतन कपात करून शिस्तभंगाची कारवाई शासनाने करावी. अशी मागणी शिक्षक लोकही आघाडीचे अध्यक्ष जनार्दन जंगले यांनी केली आहे

मुंबई पुण्यातील काय राज्यातील शिक्षण खात्यात पैसे दिल्याशिवाय कोणतेही साधे काम सुद्धा होत नाही,TDF छाती ठोकून बोलू शकते आहे कारण गेली 20 वर्षे या सर्वच भ्रष्टांचा खूप वाईट अनुभव आहे. त्याला कंटाळल्याने TDF मुंबईने 2014 मध्ये उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, 2016 मध्ये निर्णय झाला, अनेक वर्षे प्रलंबित प्रकरणांचा शिक्षण खात्याकडे TDF ने पाठपुरावा करावा असा आदेश झाला,2017 पासून शिक्षण आयुक्तालयाने नेमलेल्या चौकशी समितीने दिलेले आदेश मुंबई पुण्यातील शिक्षण संचालक ते शिक्षण निरिक्षक यापैकी एकाही अधिकाऱ्याने पाळले नाही,त्यामुळे 8 फेब्रुवारी 2021 रोजी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी सर्व दिरंगाई,भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर, व संबंधित दोषींवर सुनावणी घेऊन कारवाई करा असे स्वयंस्पष्ट आदेश दिले पणआज चार वर्षे उलटले तरी एकाही अधिकाऱ्याने आदेशाचे पालन केले नाही.

विद्यमान शिक्षण संचालक महेश पालकर याच काळात दुसऱ्यांदा या पदावर आले,त्यांना सर्व काही माहिती आहे पण त्यांना भ्रष्टाचाऱ्यांना वाचवायचे असल्याने ते प्रधान सचिव रणजीत सिंह देओल आणि शिक्षण आयुक्त सिंह यांचे आदेश पायदळी तुडवतात. कुणीही प्रधान सचिवांचे, शिक्षण आयुक्तांचे आदेश वर्षानुवर्षे कुणीच पाळत नाही,पण सर्वांचे गोपनीय अहवाल चांगले, उलट त्यांना मलईदार पोस्टवर प्रमोशन मिळते. असेही जनार्दन जंगले यांनी या मागणी पत्रात म्हटले आहे.

काही महाभ्रष्ट व गुन्हेगार की पोस्ट वरील अधिकारी आज बढती घेऊन मजेत सेवा करत आहेत,कितीही भ्रष्टाचार करा, त्यांच्याविरुद्ध कितीही पुराव्यासह तक्रारी येऊ द्या,कुणालाही शिक्षा होत नाही, त्यामुळे सर्व निर्ढावलेले आहेत,माहिती अधिकार कायद्याला पायदळी तुडवतात. त्यामुळे शासनाने नेमलेल्या SIT चे कार्यवाहीवर बोलण्याचा नैतिक अधिकार या पैसे घेतल्याशिवाय कोणतेही काम न करणाऱ्या कुणालाच नाही.अशी व्यथाही त्यांनी मांडली आहे.

## युनियन बँकेच्या 5 प्रादेशिक कार्यालयांचा ध्वजारोहण उत्साहात




**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

युनियन बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील झोनल ऑफिस आणि मुंबईतील ५ प्रादेशिक कार्यालयांनी झोनल ऑफिस इमारतीत स्वातंत्र्य दिन साजरा केला. या इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते झाले होते.

युनियन बँक ऑफ इंडियाचे झोनल हेड आणि सीजीएम बी पी दास यांनी ध्वजारोहण केले. त्यांच्यासोबत आरएच श्री राहुल जुयाल, डेप्टी झोनल हेड नटराज आणि सुरक्षा अधिकारी संजीव होते.झोनल ऑफिस, प्रादेशिक कार्यालय आणि शाखांचे कार्यकारी आणि कर्मचारी या सोहळ्यात सहभागी झाले होते. कर्मचाऱ्यांच्या मुलांचा आणि काही कर्मचाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम सर्वांना आवडला.युनियन बँक ऑफ इंडिया नेहमीच भारताचा आर्थिक आधारस्तंभ म्हणून उभा आहे आणि देशाच्या आर्थिक विकासात नेहमीच समर्पित आहे.

झोनल हेड बी पी दास आणि प्रादेशिक प्रमुख राहुल जुयाल यांनी सर्व ग्राहकांना मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले आहे.कार्यक्रमाची सांगता ड्युप्टी झोनल हेड नटराज यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

## ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम, रमेश झवर आचार्य अत्रे पुरस्काराने सन्मानित

### शिल्पतपस्वी राम सुतार यांच्या हस्ते पत्रकार संघात गौरव

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आचार्य अत्रेंचे पत्रकारितेतील योगदान नव्या पिढीला समजवून सांगण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्र समजून घ्यायचा असेल तर आधी आचार्य अत्रे समजून घेतले पाहिजेत. यासाठी मुंबई मराठी पत्रकार संघाने पुढाकार घेऊन आचार्य अत्रे अध्ययन केंद्र सुरू करावे, अशी आग्रही मागणी मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष कुमार कदम यांनी बुधवारी येथे केली.

मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे प्रतिष्ठेचा २०२५ चा आचार्य अत्रे पुरस्कार या पुरस्कार सोहळ्याचे प्रमुख पाहुणे पद्मभूषण राम सुतार यांच्याकडून स्वीकारल्यानंतर कदम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित या सोहळ्यात गेल्या वर्षीचा २०२४ सालचा आचार्य अत्रे पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार रमेश झवर यांच्यावतीने त्यांच्या कन्या अल्पना सोमाणी यांनी स्वीकारला.



सध्या महाराष्ट्रात मराठी भाषेसंदर्भात जे राजकारण सुरू आहे त्याबाबत सर्व पत्रकारांनी आवाज उठवला पाहिजे. महाराष्ट्रात दूरदर्शनवर मराठीचा अपमान सुरू होता त्यावेळी आम्ही मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे आंदोलन केले. त्यानंतर सह्याद्री वाहिनीवर मराठीला सन्मान मिळाला. तसे आंदोलन आता मराठीसाठी पुन्हा करण्याची वेळ आली आहे, असेही कदम म्हणाले.

आचार्य अत्रेंनी आमच्यातील पत्रकार घडवला अशा शब्दात रमेश झवर यांनी या पुरस्काराबाबत कृतज्ञता व्यक्त केली. त्यांचे मनोगत त्यांच्या कन्या अल्पना यांनी वाचून दाखविले.

जगभरात उत्तुंग शिल्प घडविणारे शिल्पतपस्वी पद्मभूषण राम सुतार यांच्या हस्ते पत्रकारितेतील उत्तुंग कार्य करणाऱ्या कुमार कदम आणि रमेश झवर यांचा सत्कार होतोय हा आम्हा सर्वांसाठी आनंदाचा क्षण आहे असे पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण म्हणाले. कुमार कदम यांनी आता जे अवयवदान चळवळीचे कार्य हाती घेतले आहे, त्याला पत्रकार संघाचे पुर्ण सहकार्य असेल असा शब्द चव्हाण यांनी कदम यांना दिला, पण त्याचवेळी कदम यांनी त्यांच्या पत्रकारितेतील अनुभव पुस्तक रुपाने जतन केला पाहिजे असा आग्रहही चव्हाण यांनी यावेळी धरला.

जगभरात मी अनेक सत्कार स्वीकारले, पण पत्रकार संघाने माझ्या कार्याची दखल घेऊन माझा सत्कार केला. मुंबई मराठी पत्रकार संघाने माझ्या कार्याची दखल घेतली याचे कौतुक जास्त आहे. आज ज्यांना आचार्य अत्रे पुरस्कार मिळाला त्यांचे अभिनंदन अशा शब्दात पद्मभूषण राम सुतार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या सोहळ्याचे औचित्य साधून मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार राम सुतार यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच डॉ. व्दारकानाथ कोटनीस समितीचे अध्यक्ष राजेंद्र जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सोहळ्याचे प्रास्ताविक उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर तर सूत्रसंचालन उपाध्यक्ष राजेंद्र हुंजे यांनी केले. कोषाध्यक्ष जगदिश भोवड यांनी आभार मानले. यावेळी व्यासपीठावर विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले , अजय वैद्य, राम सुतार यांचे चिरंजीव अनिल सुतार उपस्थित होते.

## मालमत्ता कराच्या पहिल्या सहामाहीचे अधिदान करण्यासाठी पालिकेची मुदतवाढ

■ **मुंबई**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या सुधारित देयकांच्या छपाईचे कामकाज काही तांत्रिक कारणास्तव वाढले आहे. तसेच, भारतीय टपाल खात्याच्या प्रणाली अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेमुळे देयकांच्या वितरणास विलंब होत आहे. त्यामुळे, मालमत्ताधारकांना देयकाचा भरणा करण्यासाठी ३ महिन्यांपेक्षा कमी कालावधी मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर, मालमत्ताधारकांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या पहिल्या सहामाहीचे अधिदान करण्यासाठी वाढीव कालावधी देण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. मालमत्ताधारकांनी सुधारित वाढीव अंतिम दिनांकानुसार अधिदानाचा भरणा करावा, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पहिल्या सहा महिन्याकरिता निर्गमित केलेल्या देयकावरील ३ महिन्यांचा देयता कालावधी १३ ऑगस्ट २०२५ पर्यंत होता. यासाठी आता प्रशासकीय विभागनिहाय (वॉर्ड) वाढीव कालावधी देण्यात आला आहे. त्यानुसार, 'ए', 'बी', 'सी', 'डी', 'ई', 'एफ दक्षिण', 'एफ उत्तर', 'जी दक्षिण', 'जी उत्तर', 'एच पूर्व', 'एच पश्चिम', 'के पश्चिम', 'पी दक्षिण', 'पी उत्तर', 'आर दक्षिण', 'आर मध्य', 'एम पूर्व' आणि 'एम पश्चिम' या विभागांसाठी (वॉर्ड) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या पहिल्या सहामाहीचे अधिदान करण्यासाठी १ नोव्हेंबर २०२५ हा अंतिम दिनांक देण्यात आला आहे. तसेच, 'के पूर्व', 'आर उत्तर', 'एल', 'एन', 'एस' आणि 'टी' विभागासाठी (वॉर्ड) १ डिसेंबर २०२५ हा अंतिम दिनांक देण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित प्रशासकीय विभागातील (वॉर्ड) मालमत्ताधारकांनी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पहिल्या सहामाहीच्या अधिदानाचा सुधारित दिनांकानुसार भरणा करावा. सदर अंतिम दिनांकानंतर थकित देयकांना दंड आकारण्यात येईल, असे पालिका प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

# इच्छाशक्ती नसलेले राज्यकर्ते! मते विकणारा कोकणी माणूस!!

**गणेशोत्सव जवळ आला की खड्यात असलेल्या पनवेल गोवा महामार्गाची आणि नसलेल्या 'सावंतवाडी टर्मिनल'ची चर्चा जोर धरू लागते. यात नवीन असे काहीच नाही. कोणत्याही घटनेवर चवीने चर्चा करणे हा कोकणी जनतेचा स्थायीस्वभाव आहे. त्यामुळेच महामार्गाचा आणि कोकण रेल्वे चर्चेचा एकप्रकारे विक्रमच झलेला आहे. कोकणी माणसांच्या याच स्वभावानुसार यंदाही या चर्चेला सुरुवात झाली आहे. सलग तीन दिवस सुट्टी आल्याने कोकणात निघालेला चाकरमानी नेहमीच्याच ठिकाणी 'माणगाव'येथे आऊट झाला. माणगावचे सुपुत्र खासदार सुनील तटकरे यांनी यंदाही मंत्री नितीन गडकरी यांना क्लीन बोल्ड केले. तटकरे यांची आऊटस्विंग गोलंदाजी पाहण्यासाठी माणगाव पासून पाच किमी पर्यंत चाकरमान्यांनी रांगा लावल्या. गणेशोत्सव सुरु झाला की महामार्गांवरील या खेळाला रंगत येते, गर्दी वाढू लागते आणि या खेळात कोकणी माणूस चिरडला जातो, त्याचा श्वास कोंडला जातो. वर्षानुवर्षे असेच सुरु आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे.. विकासाबाबत इच्छाशक्ती नसलेले राज्यकर्ते आणि आपले बहुमूल्य मत विकणारी कोकणी जनता.**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासूनच कोकण विकासापासून कायमच दूर राहिला. एकतर कोकण निसर्गाने परिपूर्ण असल्याने कोकणी माणूस या निसर्गातच रमून गेला. यामुळे विकास म्हणजे काय! शासनाच्या योजना म्हणजे काय! याबाबतची माहिती जाणून घेण्याचा त्याने कधीच प्रयत्न केला नाही. दुसरे म्हणजे कोकणच्या विकासाबाबत राज्यकर्त्यांमध्ये जी इच्छाशक्ती हवी होती ती सुरुवातीपासूनच नसल्याने विकासाबाबत कोकण प्रांत कायमच दुर्लक्षित राहिला. तरीही कोकणचा 'कॅलिफोर्निया' करणार! असे सांगून कोकणी जनतेच्या ढोपराला गुळ लावण्याचे काम चलाख राज्यकर्त्यांनी नेहमीच केले. पण कोकणचा कॅलिफोर्निया करणाऱ्या जुमलेबाज राज्यकर्त्यांनी कोकणचा नरक कसा केला हे ज्यांना पाहायचे आहे किंवा अनुभवायचे असेल तर त्यांनी पनवेल गोवा मार्गानी जरूर प्रवास करावा. 'नरक' सुद्धा मागे पडेल अशी या महामार्गाची अवस्था झालेली दिसून येईल. यामुळे कोकणात असलेल्या आपल्या गावी कोकणी माणसाने कसे जावे असा प्रश्न मागील 20 वर्षाहून अधिककाळ कोकणच्या जनतेबरोबरच पर्यटकांसमोर निर्माण झालेला आहे. कोकणच्या जनतेच्या या प्रश्नाचे उत्तर राज्यकर्त्यांनी कोकणच्या जनतेला समजून सांगायला हवे. कारण या जनतेने प्रवास कसा करावा रेल्वेचे आरक्षण मिळत नाही आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस जवळपास इतिहास जमा झालेली आहे. त्यामुळे महामंडळाच्या बसमधून 500 किमी लांबीचा प्रवास करणे तसे शक्यच नाही. यामुळे महामंडळाच्या एकूण कार्यपद्धतीवर प्रवासाचा विश्वासच राहिलेला नाही. परिवहन विभाग म्हणजे शासनाने पोसलेला 'वळू' अशीच चर्चा आहे. आजपासून ३५ वर्षांपूर्वी या महामंडळाचे अध्यक्ष म्हणून पी. के. अण्णा पाटील होते. तेव्हापासून महामंडळाच्या गचाळ कारभाराच्या बातम्या मी करीत आलो आहे. महामंडळ फायद्यात येण्यासाठी याच अण्णा पाटील महाशयांनी प्रवाशांच्या जीवाशी खेळ करत पत्रा कपातीची योजना आणली. या योजनेनुसार महामंडळाच्या बसचा आतील पत्रा काढला गेला. फक्त बाहेरील बाजूस असलेला पत्रा ठेवण्यात आला. त्यावेळी महामंडळाच्या कर्मचारी संघटनेने या योजनेला विरोध केला होता. पण मी सांगेन तीच पूर्व दिशा हा राज्यकर्त्यांचा हेका नेहमीच असतो. त्याच अहंकारी पद्धतीने अण्णा पाटील वागले. त्यामुळे जे व्हायचे तेच झाले. महामंडळाच्या बसचा जेव्हा अपघात होत असे तेव्हा प्रवाशी



जास्त दगावू लागले. यामुळे पत्रा कपातीच्या योजनेची ओरड झाली. परिणामी अण्णा पाटीलांची मेख शासनाच्या लक्षात आली, आणि पत्रा कपातीचा निर्णय मागे घेण्यात आला. तेव्हापासून महामंडळाला जी साडेसाती लागली त्यातून महामंडळ अद्यापही बाहेर पडले नाही. परिवहन मंत्री पदी आलेल्या प्रत्येकानी विकासाचे हवेत बाण सोडले



**दिसले ते लिहिले**

**सुरेंद्र मुळीक**

पण प्रत्यक्षात ते महामंडळात सुधारणा करूच शकले नाहीत. १९९५ साली शिवसेना भाजपा युतीच्या काळात प्रमोद नवलकर आणि रामदास आठवले असे परिवहन मंत्री झाले. त्यापैकी नवलकर यांनी महामंडळाच्या बसवर असलेला ऑफ व्हाईट रंग बदलून भगवा रंग लावण्याचे काम केले आणि महामंडळाचा विकास झाला अशी बोंब ठोकली. तर रामदास आठवले परिवहन मंत्री होताच मी त्यांची मुलाखत घेण्यासाठी मंत्रालयात पोहचलो. रामदास आठवले म्हणाले की.. महामंडळाच्या बस मध्ये अमूलाग्र बदल करणार असून चालकांना मालक केले जाईल. पण मंत्रिपद जाताच चालक चालकच राहिला. हा सारा अनुभव पाहता परिवहन मंत्री प्रताप सरनाईक महामंडळाच्या बसमध्ये सुधारणा घडवून आणतील असे म्हणणे प्रचंड धाडसाचे होईल. ते मात्र एक करू शकतात.. कर्नाटक राज्यातील परिवहन महामंडळाची पाहणी केली त्याचपद्धतीने अनेक राज्यातील परिवहन महामंडळाची फक्त पाहणी करू शकतील. महामंडळातील बस मध्ये सुधारणा अजिबात करू शकणार नाही 40 वर्षे महामंडळाचा केलेल्या अभ्यासावरून ठामपणाने मी असे विधान करीत आहे. महामंडळाचा एकंदरीत कारभार पाहता मंत्री प्रताप सरनाईक यांनी महामंडळाच्या बसवरील नामफलक जरी व्यवस्थित केले तरी प्रवासी दुवा देतील. पण मंत्रिपदाच्या कार्यकाळात नामफलक व्यवस्थित लावण्याचेही ते सत्कार्य करू शकणार नाही असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आज हिच फाटलेली लक्तरे घेऊन जर महामंडळाची बस धावत असेल तर अशा बसमधून अत्याधुनिक युगातील तरुण कसा प्रवास करेल हा साधा प्रश्न आहे. यामुळेच कोकणातील एसटी बस जवळपास इतिहास जमा झालेली दिसत आहे.

## शिस्तबद्ध रेल्वे

याच नहामंडळाच्या बस ची जागा १९९७ साली कोकण रेल्वेने घेतली. आणि कोकणी जनता आनंदाने उड्या मारू लागली. कारण कोकणी जनतेचा समज असा झाला की हि रेल्वे फक्त कोकणच्या जनतेच्या साठीच आहे. हा समज होण्याचे कारण म्हणजे महामंडळाला असलेले कोकण रेल्वे हे नाव, आणि दुसरे म्हणजे सिंधुदुर्ग झिल्ह्याचे खासदार प्रा. मधू दंडवते यांनी कोकण रेल्वे मार्गासाठी केलेले प्रयत्न. यामुळेच कोकणच्या जनतेत हा समज पसरला. तसे होणे स्वाभाविक होते. परंतु भौगोलिक दृष्ट्या कोकण नव्हे तर कोंकण (KONKAN ) प्रांत हा डहाणू पासून केरळ पर्यंत पसरलेला आहे म्हणूनच या रेल्वेला कोंकण(KONKAN) रेल्वे हे नाव देण्यात आले. मुळात कोकण रेल्वे हा मार्ग महाराष्ट्रातील कोकणी जनतेसाठी तयार करण्यात आला असे अजिबात नाही. तर कोकण प्रांताच्या समुद्रकिनार पट्टीवर भविष्यातील सुरक्षेच्या दृष्टीने लोहमार्ग असावा अशी फार पूर्वी पासून योजना होती. केरळ पासून कर्नाटकातील 'ठोकूर'पर्यंत हा रेल्वेमार्ग पूर्ण झालेला होताच आणि महाराष्ट्रात रोहा पर्यंत मार्ग मध्य रेल्वेने पूर्ण केलेला होता. परंतु रोहा ते ठोकूर हा मार्ग डोंगराळ असल्याने त्यातच प्रवाशांची संख्या आणि अत्याधुनिक यंत्रणा नसल्याने हा मार्ग रखडाला होता. समुद्रकिनार पट्टीवरील या मार्गाला केवळ जोडण्याचे काम कोकण रेल्वे महामंडळाने केले. कदाचित सावंतवाडी पर्यंतच हा रेल्वे मार्ग करण्यात आला असता तर प्रवासी संख्येअभावी हा मार्ग केव्हाच बंद झाला असता. म्हणूनच हा मार्ग ठोकूरला जोडल्याने हा मार्ग कायमस्वरूपी जिवंत राहिला. प्रवाशी असल्याशिवाय कोणतीही वाहतूक चालवीणे अशक्य असते. कोकणात प्रवासी संख्या सुरुवातीपासून नव्हतीच. कारण भौगोलिक दृष्ट्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हा मोठा असला तरी या दोन जिल्ह्याची लोकसंख्या फारच कमी आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग दोन्ही जिल्ह्याची लोकसंख्या जवळपास 23 लाखाच्या आसपास आहे. महिला आणि मुलांची संख्या वगळता या दोन्ही हिल्ह्यातील अंदाजे दिढ लाख जनतेचे मुंबई पुणे येथे वास्तव असावे. त्यातील बहुतांश मुंबईत राहतात. महत्वाचे म्हणजे मूळ मुंबईत राहणाऱ्या कोकणी माणसांची संख्या फारच कमी आहे. मागील दोन दशकात हि संख्या मोठ्या प्रमाणात घटली. विभक्त कुटुंब पद्धती आणि वाढलेल्या घरांच्या किंमतीमुळे अनेकांना मुंबई बाहेर ठाणे, पालघर,रायगड जिल्ह्यात घरे घ्यावी लागलीत. याचा सारा परिणाम कोकण रेल्वेच्या वाहतूकीवर झाला. त्यात रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश तालुके आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैभववाडी देवगड, मालवण या तालुक्यातील चाकरमानी रेल्वे पेक्षा खासगी बसना अधिक पसंती देतात. किंवा इतर राज्यातून गोवा केरळ च्या दिशेने जाणाऱ्या रेल्वे गाडयांना अधिक पसंती देतात. यामुळे सावंतवाडी साठी असलेली एकमेव तुतारी गाडी प्रवाशांनी बाराही महिने दोन्ही बाजूने तुडुंब भरताना दिसत नाही. आजच तुतारीची आरक्षण पाहिले तर दि. 20 पासून 27 ऑगस्ट पर्यंत सावंतवाडी पासून मुंबईला जाण्याचे तिकिटाचे आरक्षण मुबलक आहेत. दुसरे वास्तव म्हणजे रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 99.99 टक्के जनतेचा प्रवास मुंबईच्या दिशेने आहे त्यामुळेच लांब पल्याच्या गाडयांना थांबा देण्यास रेल्वे बोर्ड सहजा सहजी तयार होत नाही. कारण एका जिल्ह्यात दोन दोन ठिकाणी थांबा दिला आणि जास्तीतजास्त कोकणच्या जनतेने तिकिटे आरक्षित केलीत तर या जागा केरळ किंवा कर्नाटक पर्यंत रिकाम्याच जातील याचे नुकसान रेल्वेच्या त्या झोनला सहन करावे लागेल म्हणूनच थांबा देणे रेल्वेला शक्य होत नाही. सावंतवाडी टर्मिनल चा मुद्दा येथेच येऊन थांबलेला आहे. प्रवासी अभावी टर्मिनल चा मुद्दा पुढे सरकणे तितकेसे सोपे नाही. चिपी विमानतळ विमानसेवा का बंद झाली. कारण हेच. पुरेसे प्रवासी नसल्यानेच ही सेवा बंद झाली. याच कारणांमुळे रेल्वेने नुकतीच सुरु केलेल्या प्रवाशी रोरो सेवेचा कणकवली थांबा बंद झाला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आणि मालवण मुंबई जलवाहतूक सेवा याच कारणांमुळे बंद होण्याची जास्त शक्यता आहे. शेवटी कोणतीही कंपनी आपला फायदा पाहत असते. कोणीही नुकसानीत जाऊन कंपनी चालवीणार नाही. यात राज्याकर्त्यांचे काहीच चुकलेले नाही त्यांनी कोकणच्या जनतेला विविध सुविधा देण्यासाठी योजना आखल्या पण प्रवाशी अभावी त्या बंद झाल्यात. याउलट गोवा राज्याचे पहा. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यापेक्षा गोव्याची लोकसंख्या कमी आहे. केवळ 15 लाख. तरीही देशभरातील भारतीय रेल्वेचे सारे झोन गोवा राज्यात गाडी सोडण्यास उत्सुकता दाखवितात. याचे कारण प्रवाशी संख्या. पर्यटन क्षेत्रात गोवा राज्याचे नाव संपूर्ण जगात असल्याने गोव्यात पर्यटकांची रिघ असते. आणि या पर्यटकांना गोव्यात ने - आण करण्यासाठी विमान आणि रेल्वे सेवेत स्पर्धा सुरु असते. एक विमानतळ अपुरे झाले त्यामुळे दुसरे विमानतळ मोपा येथे उभारण्यात आले तेही आंतरराष्ट्रीय. इवल्याशा गोव्याने केवळ पर्यटनाच्या आणि पर्यटकांच्या जोरावरच हे सारे केले. केवळ सहा वर्षात उत्तर गोव्यात विमान तळ उभारून उत्तर गोव्यातही पर्यटनाला चालना देण्यात आली. पण सिंधुदुर्ग जिल्हा



पर्यटन जिल्हा म्हणून गोषित होऊन २६ वर्षे झालीत तरीही पर्यटक दिसतच नाही. जर देशभरातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात वाढली असती तर कोकण रेल्वे असो किंवा भारतीय रेल्वे असो त्यांच्याजवळ थांबा मागण्याची विनंती करावी लागलीच नसती. आणि सावंतवाडी टर्मिनलचा प्रश्नही केव्हाच सुटला असता. कोकणात पर्यटन व्हावे, पर्यटक मोठ्या प्रमाणात यावेत अशी राज्यकर्त्यांना इच्छाच नाही तेथेच कोकणचा सारा विकास थांबला गेला. कोकणचा विकास करायचा असेल तर पर्यटनाशिवाय पर्याय नाही. असे १९९९ साली तत्कालीन मुख्यमंत्री नारायण राणे यांनी स्पष्ट केले होते त्यासाठी राणे यांनी आराखडाही तयार केला होता. पण राज्यकर्त्यांच्या आपापसातील सुडाच्या राजकारणामुळे पर्यटन इतिहास जमा झाले आणि रासायनिक कंपन्यांची कोकणात येण्यासाठी धडपड सुरु झालेली आहे. कोकणचा महामार्ग रखडविण्या मागे हेच महत्वाचे कारण आहे.



## महामार्ग कोणासाठी!

तसे पाहिले तर कोकण हा आर्थिक दृष्टीने अत्यंत मागासलेला प्रदेश. त्यामुळे चाकरमान्यांच्या मनिऑर्डर वर जगणारा अशी कोकणची ओळख होती. आजही त्यात फारसा फरक झालेला दिसत नाही. आजही कोकणातील बाजारपेठा मुंबईकरांच्याच जीवावर टिकून आहेत. कोरोना काळात हे पुन्हा एकदा अधोरेखित झालेले दिसून आले. हे सारे पाहता कोकण महामार्गाची ओरड कोण करत आहे हे सारे न कळण्यासारखे आहे. कोकणातील ८५ टक्के जनता रेल्वे, एसटी आणि खासगी बस ने कोकणात येते. तरीही कोकण महामार्गाची ओरड करून कोकणात विकास होणारच नाही असे चित्र निर्माण केले जात आहे. या ओरड करण्यामागे अदृश्य शक्तीचा हात असावा. जेणेकरून कोकणातील जनतेने अधिकाधिक जमीन विकावायस हवी. सद्यस्थितीत पनवेल पासून सावंतवाडी पर्यंत महत्वाच्या जागा विकल्या गेलेल्या आहेत. विकलेल्या कोकणसाठी या महामार्गाची तयारी सुरु आहे. पण तात्काळ महामार्ग तयार झाला तर कोकणचा विकास वेगाने होईल आणि या विकासाच्या निमित्ताने कोकणी तरुण उद्योजक झाला तर! शासनाला, उद्योगपतीना कोकणात अपेक्षित असलेल्या जागा खरेदी करता येणार नाही अशी भीती आहे. यामुळेच हा महामार्ग तयार करण्याची राज्यकर्त्यांची इच्छाच नाही असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. रायगड जिल्ह्यातील ज्या 'माणगाव' आणि 'इंदापूर' बायपास रस्त्यामुळे मागील 15 वर्षे वाहतूकीची कोंडी होत आहे. त्यात कोकणी माणूस चिरडला जातो हे सारे राज्यकर्त्यांना माहित नाही अशातला भाग नाही. राज्यकर्त्यांची इच्छा शक्ती असली असती तर हे दोन बायपास केवळ आठ दहा महिन्यात पूर्ण कारण्यासारखे आहेत. पण राज्यकर्त्यांचीच इच्छा नाही त्यामुळेच कोकणचा मार्ग रखडला. किंबहुना जाणीवपूर्वक रखडवीला असे म्हणावायस हवे. या वाहतूक कोंडीला पोलीस विभागही तितकाच जबाबदार आहे. एखादा मंत्री येणार असेल तर माणगाव आणि इंदापूर येथे होणारी वाहतूकीची कोंडी तात्काळ दूर केली जाते. सुरु मिले तुम्हारा हमारा असे पोलीस आणि राज्यकर्ते वागत आहेत. याला सर्वात महत्वाचे कारण म्हणजे निवडणुकीत विकला गेलेला कोकणी माणूस. कोकणी माणसाने आपले बहुमूल्य असे मत विकून माणुसकीच्या बाजारात स्वतःची किंमत कमी केलेली आहे. हजार दोन हजार दिले की कोकणी माणूस मत विकतो अशी महाराष्ट्रात आणि देशात चर्चा होऊ लागलेली आहे. विकलेल्या या मतांमुळेच विकासाबाबत त्याचा बोलण्याचा अधिकाराचा त्याने स्वतःहून गमविला आहे. १२ वर्षे रखडलेला कोकणचा महामार्ग हे त्याचे ज्वलंत उदाहरणं आहे. कोकणी माणसाने विकलेल्या मताचे हे पाप आहे. या पापात चाकरमान्यांचा जीव जात आहे. हिच कोकणची खरी शोकांतिका आहे.

